CMYK
dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १६ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३३६ | पाने : ८ | किंमत रु. ६/–

# करजखेडा पाटीजवळ भीषण अपघात; एकाचा जागीच मृत्यू, चारजण गंभीर

**धाराशिव, दि.१५ मार्च -**

तुळजापूर-लातूर राष्ट्रीय महामार्गावरील करजखेडा पाटीजवळ रविवारी भीषण आणि विचित्र तिहेरी अपघात घडून एकाचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले.



मिळालेल्या माहितीनुसार, भरधाव वेगाने येणार्या बोलेरो वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. नियंत्रण सुटलेल्या बोलेरोने प्रथम समोरून येणार्या वॅगनआर कारला जोरदार धडक दिली. त्यानंतर बोलेरो पलटी होऊन रस्त्याच्या दुसर्या लेनमध्ये जाऊन स्विफ्ट कारवर आदळली.

या तिहेरी धडकेत अपघात अत्यंत भीषण झाला असून एकाचा जागीच मृत्यू झाला. तसेच चार जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात होंडा सिटी कारमधील जीवन वसंत पाटील (वय ७०) यांचा मृत्यू झाला. तर नित्यानंद मोहन बुके (वय ३५), मोहन बुके (वय ५५), अर्जुन पटुळे (वय ५५) व आणखी एक अनोळखी पुरुष (अंदाजे वय ४०) असे चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी शासकीय जिल्हा रुग्णालय, धाराशिव येथे हलविण्यात आले आहे.

अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की काही काळ घटनास्थळी भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच बेंबळी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना बाहेर काढून उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर येथे पाठविण्याची व्यवस्था केली.

दरम्यान, अपघातामुळे काही काळ तुळजापूर-लातूर मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. याप्रकरणी अधिकचा तपास पोलीस करीत आहेत.









सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शासनाच्या योजना नागरिकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत







## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे आवाहन

## तळेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**बीड, दि. १५ मार्च-**

गावागावातील नागरिकांच्या समस्या त्वरित सोडविणे आणि शासनाच्या सर्व योजना थेट प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महसूल विभागासह विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना त्यांच्या गावातच मिळावा यासाठी राज्य शासनाने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' मंडळ स्तरावर आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. या शिबिरांचा प्रभावी वापर करून गावातील सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवाव्यात, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.

बीड तालुक्यातील तळेगाव येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त पापळकर पुढे म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी वारंवार तहसील किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात येण्याची गरज भासू नये, यासाठीच मंडळ स्तरावर शिबिरे घेण्याची संकल्पना राबविण्यात येत आहे. या शिबिरांच्या माध्यमातून महसूल विभागाशी संबंधित विविध प्रश्नांसह शासनाच्या समाजोपयोगी योजनांची माहिती व लाभ नागरिकांना दिले जाणार आहेत.

शेतकऱ्यांसाठी शेतपांदण रस्ते, बांधावरील मार्ग यासंदर्भात अनेकदा वाद-विवाद निर्माण होतात. अशा समस्या सोडवण्यासाठी राज्य शासनाने शेतपांदण रस्ते उपक्रम सुरू केला असून तो ३० मेपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. गावागावातील प्रश्न सोडवताना तलाठी, सरपंच आणि स्थानिक प्रतिष्ठित नागरिक यांच्या समन्वयातून उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. शिबिरांमध्ये संजय गांधी निराधार योजना, वारसा हक्काचे फेरफार, जिवंत सातबारा, आयुष्मान भारत आरोग्य योजना यांसह विविध योजनांबाबत नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण केले जात आहे. गावातील प्रत्येकाने पक्षीय भेदभाव बाजूला ठेवून गावकऱ्यांच्या समस्या या शिबिरात मांडाव्यात आणि नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त पापळकर यांनी केले. प्रशासनातील अधिकारी अथवा कर्मचारी नागरिकांचे प्रश्न सोडवण्यात टाळाटाळ करत असतील तर नागरिकांनी थेट जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. शिबिरात प्रातिनिधिक स्वरूपात जातीचे प्रमाणपत्र, आयुष्मान भारत आरोग्य कार्ड, गरोदर मातांना आरोग्य किट यांसह विविध योजनांतील लाभांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, तळेगावचे सरपंच तसेच परिसरातील इतर गावांचे सरपंच आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### कुटुंबाला हक्काची जागा मिळण्याचा मार्ग मोकळा

पारधी समाजातील आप्पा भुजा पवार यांनी आपल्या कुटुंबाला हक्काचे घर मिळावे आणि मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी अनेक वर्षे सातत्याने संघर्ष केला. मात्र, दुर्दैवाने सन २०२३ मध्ये त्यांचे निधन झाले. या प्रकरणाची प्रशासनाने दखल घेत पवार कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी तळेवाडी येथे एक एकर जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात आली. आज या संदर्भातील पुढील कार्यवाही छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते पार पडली. या निर्णयामुळे संबंधित कुटुंबाला हक्काची जागा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून त्यांच्या पुनर्वसनाला मोठी मदत होणार आहे. आप्पा पवार यांनी आपल्या कुटुंबाच्या भविष्यासाठी केलेल्या संघर्षाला अखेर न्याय मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## नवरंगातील नऊ गुढ्यांचे पूजन आणि भव्य शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. १५ मार्च -**

सिडको-हडको हिंदू नववर्ष स्वागत समिती आणि कुलस्वामिनी प्रतिष्ठान यांच्या वतीने गुढीपाडवा निमित्त विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. युगाब्द ५१२८ गुरुवार, १९ मार्च २०२६ रोजी वर्षप्रतिपदेपासून या उपक्रमांना सुरुवात होणार आहे. गुढीपाडवा ते हनुमान जन्मोत्सव या कालावधीत विविध कार्यक्रमांची रूपरेषा आखण्यात आली आहे.

गुढीपाडव्याच्या दिवशी एन-८ येथील शिवदत्त प्रवेशद्वारापासून सकाळी १० ते १२ या वेळेत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. प्रारंभी दुर्गा मातेच्या नऊ रूपांचे प्रतीक असलेल्या नऊ गुढ्यांचे पूजन करण्यात येईल. त्यानंतर पारंपरिक वेशभूषेत सुमारे ५०० महिला व पुरुषांच्या सहभागासह शोभायात्रा मार्गस्थ होईल. यात सजवलेले घोडे, रथ, भालदार-चोपदार, बँड पथक आणि स्वागत कमानींचा समावेश असेल. बजरंग चौक येथे उभारण्यात आलेल्या २१ फूट उंच गुढीच्या पूजनाने कार्यक्रमाचा समारोप होणार असून या वेळी नामदार अतुल सावे व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

धर्मवीर संभाजी विद्यालयातर्फे सकाळी ६.३० वाजता विद्यार्थ्यांची वेषभूषा शोभायात्रा काढण्यात येणार आहे. तसेच कॉलनीची गुढी व कॉलनीची रांगोळी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. २२ मार्च रोजी किराडपुरा येथील राम मंदिरात महिला भजन स्पर्धा होणार आहे. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीत समितीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## श्री स्वामी समर्थ केंद्रातर्फे फळे वाटप

**गंगापूर, दि.१५ मार्च -**


प.पु गुरुमाऊली पिठाधीश अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक सेवा केंद्र श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर (नाशिक) यांच्या अभिष्टचिंतना निमित्त पाप मोचनी एकादशीच्या शुभ मुहर्तावर गरजूंना श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक सेवा गंगापूर केंद्रातील सेवेकरी यांच्या वतीने केंद्र गंगापूर येथे गरजूना फळे वाटप करण्यात आले. या प्रसंगी झुंझारराव काकडे, तालुका प्रतिनिधी गोपीनाथ प्रधान सर सुधाकर सपकाळ, कमलाकर वखारे, राजेंद्र जगदाळे, राम काळे, साईनाथ काळे इ. सेवेकरी उपस्थित होते.

# विश्वशांतीसाठी १००८ कोटी नवकार जपानुष्ठानाचा आजपासून मंगल प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. १५ मार्च-**

जागतिक शांतता आणि मानवजातीच्या कल्याणासाठी 'नवकार फाऊंडेशन' आणि 'जितो' छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या १००८ कोटी नवकार महामंत्र जपानुष्ठानाचा आज, १४ मार्चपासून उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. 'नवकार दिवसा'च्या निमित्ताने आयोजित हे विशेष २७ दिवसीय जपानुष्ठान ९ एप्रिलपर्यंत चालणार असून, याद्वारे संपूर्ण विश्व सकारात्मक ऊर्जेने भारून टाकण्याचा संकल्प करण्यात आला आहे. आजपासून सुरू झालेल्या या आध्यात्मिक महायज्ञात सहभागी होऊन आपले घर आणि मन 'नवकारमय' करण्याचे आवाहन सकल जैन समाजाला करण्यात आले आहे.

जगातील सद्यस्थिती आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली अशांतता दूर करण्यासाठी हा जपानुष्ठान सोहळा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. प.पू. गच्छाधिपती अभयदेवसुरीश्वरजी महाराजांच्या प्रेरणेने आणि आशीर्वादाने हा उपक्रम हाती घेण्यात आला असून, आजपासून प्रत्येक जैन बांधवाने आपल्या कुटुंबासह दररोज किमान ४५ मिनिटे नवकार महामंत्राचा जप करण्यास सुरुवात करायची आहे.




वैयक्तिक जपाबरोबरच, गावागावातील आणि शहरातील सर्व जैन संस्थांमध्येही सामूहिक जपाचे आयोजन आजपासून सुरू होत आहे.

गेल्या पाच वर्षांच्या परंपरेनुसार, महावीर जन्मकल्याणक महोत्सवाच्या निमित्ताने नवकार फाऊंडेशनच्या या आवाहनाला देश-विदेशातून मोठा प्रतिसाद मिळत आला आहे. यापूर्वी दोन वेळा झालेल्या विश्वविक्रमी सहभागाचा वारसा जपत, यावर्षी देखील विश्वशांतीच्या मंगल भावनेने हा उपक्रम राबवला जात आहे. नवकार करे बेडापार या श्रद्धेसह संघ, समाज आणि राष्ट्रात शांती नांदावी, या उद्देशाने अभय वाणी परिवार, नवकार फाऊंडेशन आणि जितो छत्रपती संभाजीनगर यांनी या उपक्रमाचे नियोजन केले आहे. आजपासून सुरू होणाऱ्या या साधना पर्वात विश्व नवकार दिवस (९ एप्रिल) पर्यंत जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे, असे आमंत्रण संयोजकांनी दिले आहे.

यासाठी प्रकल्प प्रमुख रवी मुगदिया, अनिलकुमार संचेती, विलास साहूजी, संजय संचेती, विनोद बोकडिया, राजेश मुथा, अजित जैन, रवी लोढा, निलेश जैन, पंकज साकला, हितेश कांकरिया, प्रकाश कोचेटा, अभिजीत हिरप, पियुष कासलीवाल, विकास रायमाणे, अमित काला, संतोष पापडीवाल आणि समीर ठोळे आदी परिश्रम घेत आहेत.

अहिंसा आणि जागतिक शांततेचा संदेश देणाऱ्या 'विश्व नवकार महामंत्र दिवसा'चे औचित्य साधत, सकल जैन समाजाने केंद्र सरकारप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. गेल्या वर्षी, ९ एप्रिल २०२५ रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित भव्य कार्यक्रमात स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्व नवकार दिवसाचे उद्घाटन केले होते.

# एमजीएममध्ये हुतात्मा सैनिकांच्या कुटुंबियांना मोफत शिक्षण

## भारतीय सैन्यदल आणि एमजीएम विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि.१५ मार्च -**

महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि भारतीय सैन्यदल यांच्यात कौशल्य विकास, प्रशिक्षण, संशोधन आणि शैक्षणिक सहकार्य अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने सामंजस्य करार करण्यात आला. एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात आयोजित विशेष कार्यक्रमात हा करार संपन्न झाला. या सामंजस्य करारावर एमजीएम विद्यापीठाकडून कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ यांनी आणि लेफ्टनंट जनरल मुकेश चड्डा, डायरेक्टोरेट जनरल ऑफ सप्लाइज अँड ट्रान्सपोर्ट, भारतीय सेना यांनी स्वाक्षरी केली. या कराराच्या अंतर्गत देशासाठी हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्मा सैनिकांच्या कुटुंबियांना एमजीएम विद्यापीठात मोफत शिक्षण दिले जाणार आहे.

सामंजस्य कराराच्या कार्यक्रमाला कुलपती अंकुशराव कदम, मेजर जनरल श्यामजी यादव, कर्नल सज्जल थापा, लेफ्टनंट कर्नल हरी दत्त पोखरियाल, मेजर गुरप्रीत सिंग मुल्तानी, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच.एच.शिंदे, उपकुलसचिव डॉ.परमिंदर कौर तसेच विद्यापीठातील अधिकारी आणि सैन्यदलाचे प्रतिनिधी उपस्थित होते.



या कराराचा प्रमुख उद्देश भारतीय सैन्यदलातील हुतात्मा, सेवेत असलेले आणि निवृत्त सैनिक तसेच संरक्षण क्षेत्रातील नागरी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. विशेषतः सैनिकांच्या कुटुंबीयांना शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या माध्यमातून शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या सेवेचा व बलिदानाचा सन्मान करणे, हा या कराराचा महत्त्वाचा भाग आहे. या सामंजस्य करारानुसार एमजीएम विद्यापीठ आणि भारतीय सैन्यदल या दोन प्रतिष्ठित संस्थांमध्ये शैक्षणिक, संशोधन व विकास क्षेत्रात सहकार्य वाढविण्यात येणार आहे. मानवी संसाधन विकासासाठी ज्ञानवृद्धी, संयुक्त संशोधन, प्रशिक्षण कार्यक्रम, सल्लागार सेवा, शैक्षणिक संसाधनांचे आदानप्रदान आणि विविध तांत्रिक क्षेत्रांत प्रोटोटाइप विकसित करण्यासारख्या उपक्रमांना चालना दिली जाणार आहे.

विशेष म्हणजे, भारतीय सैन्यदलातील शहीद जवानांच्या कुटुंबीयांना, दहशतवादविरोधी कारवायांमध्ये प्राण गमावलेल्या सैनिकांच्या मुलांना, शौर्य पुरस्कार प्राप्त सैनिकांच्या कुटुंबीयांना तसेच सेवेत असताना निधन झालेल्या जवानांच्या मुलांना एमजीएम विद्यापीठाकडून वार्षिक शुल्कावर १०० टक्के शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. यामध्ये ट्युशन फी, प्रवेश शुल्क आणि नोंदणी शुल्क यांचा समावेश असेल. तसेच सेवेदरम्यान ५० टक्क्यांहून अधिक दिव्यांगत्व आलेल्या सैनिकांच्या कुटुंबीयांसाठी संपूर्ण अभ्यासक्रम शुल्क (परीक्षा शुल्कासह) पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. हा सामंजस्य करार स्वाक्षरीच्या तारखेपासून लागू होणार असून शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ ते २०३० - ३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी वैध राहणार आहे.



## विभागीय आयुक्तांकडून जनसहयोग संस्थेतील वृक्षांची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. १५ मार्च -**

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज येथील जनसहयोग या सेवाभावी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या 'संपूर्ण वन' जैवविविधता उद्यानाला भेट देऊन तेथील विविध वृक्षसंपदेची पाहणी केली. यावेळी त्यांनी वड वन, औषधी वनस्पती उद्यान, तसेच सर्व धर्म वाटिका अशा सुमारे २० प्रकारच्या वाटिकांमधील विविध वृक्ष व वनस्पतींची माहिती जाणून घेतली.

अहिल्यादेवी होळकर शेळी व मेंढी पालन केंद्र, पडेगाव परिसरातील जवळपास २५ एकर क्षेत्रात विकसित करण्यात आलेल्या या वृक्षराईत सुमारे ४०० प्रकारच्या देशी, दुर्मिळ आणि औषधी वनस्पतींच्या प्रजातींचे संवर्धन करण्यात येत आहे. विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी या वृक्षसंपदेची प्रत्यक्ष पाहणी करून वृक्षारोपण आणि संवर्धनाच्या उपक्रमांची माहिती घेतली.

यावेळी त्यांनी प्रामुख्याने देशी प्रजातींची लागवड, रोपांची आरोग्यस्थिती, ठिबक सिंचनाची व्यवस्था आणि जैवविविधता संवर्धनासाठी केलेले प्रयत्न यांचे कौतुक केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच औषधी वनस्पतींचे जतन करण्यासाठी अशा उपक्रमांना अधिक बळ मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या संस्थेला आर्थिक व तांत्रिक सहाय्य मिळावे यासाठी सामाजिक वनीकरण विभागासोबत लवकरच बैठक आयोजित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जनसहयोग सेवाभावी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे कर्मचारी तसेच ज्येष्ठ पत्रकार अण्णा वैद्य उपस्थित होते.

# १७ एप्रिलला सिनेमागृहांमध्ये येणार 'लाडकी बहीण'

## गीत-संगीताच्या मेजवानीसह कौटुंबिक मनोरंजनाचे पॅकेज

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. १५ मार्च -**

काही चित्रपट घोषणेपासूनच रसिकांच्या मनात कुतूहल जागविण्याचे काम करतात. समाजात घडणाऱ्या घटनांवर वेध घेत, त्यावर भाष्य करणाऱ्या अशाच एका चित्रपटाची सिनेसृष्टीपासून रसिकांपर्यंत सर्वच ठिकाणी जोरदार चर्चा आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने सुरू केलेल्या बहुचर्चित 'लाडकी बहिण योजने'चे समाजात विविध प्रकारे पडसाद उमटले. सरकारी योजनेतील 'लाडकी बहीण' चहूबाजूला चर्चेचा विषय ठरली. आता हिच 'लाडकी बहीण' रुपेरी पडद्यावरही झळकणार आहे. '१५०० रुपये हप्ता आमच्या संसारात लाखापेक्षा भारी' असे म्हणत 'लाडकी बहीण' हा आगामी चित्रपट १७ एप्रिल रोजी महाराष्ट्रभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

शुभम फिल्म प्रोडक्शन प्रस्तुत 'लाडकी बहीण' चित्रपटाच्या दिग्दर्शिका शितल शिंदे असून, त्यांनी शनिदेव फिल्म्सच्या बॅनरखाली निर्मितीही केली आहे. या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद गणेश शिंदे यांनी लिहिले आहेत. बाबासाहेब पाटील या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते आहेत. लेखक प्रताप गंगावणे चित्रपटाचे मार्गदर्शक असून, शेखर मते, पंकज चव्हाण, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, लहू साळुंखे यांचे 'लाडकी बहीण'ला विशेष सहकार्य लाभले आहे. चित्रपटाचे 'लाडकी बहीण' हे शीर्षक खूप विचार करायला लावणारे आहे. या चित्रपटात काय पाहायला मिळणार याचे संकेत पोस्टरवर दिलेल्या टॅगलाईनवरून मिळतात. हा चित्रपट फक्त शासकीय योजनेवर भाष्य करणारा आहे की, यात आणखी काही नाट्यमय घडामोडी दडलेल्या आहेत याबाबतही कुतूहल वाटते. या चित्रपटात स्मिता तांबे मुख्य भूमिकेत झळकणार असून, तिच्या जोडीला सुरेखा कुडची, उषा नाडकर्णी, उषा नाईक, गौतमी पाटील, रुक्मिणी सुतार (सरू आजी), सारिका जाधव, पूनम कापसे, माधव अभ्यंकर, शशांक शेंडे, अनिल नगरकर, सुरेश विशावकर्मा, सिद्धेश्वर झाडबुके, गणेश शिंदे, दर्शना जोकरे, मेगा शिंदे आदी कलाकार आहेत. एखादी सरकारी योजना सर्वसामान्य गृहिणीच्या संसाराला कशा प्रकारे हातभार लावू शकते याचे चित्रण या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. 'एकमेकां साह्य करू अवघे धरू सुपंथ...' या उक्तीचा अवलंब करीत गोरगरीब महिला एकत्र येतात आणि कशा प्रकारे आपला उत्कर्ष साधतात हा एक महत्त्वपूर्ण पैलू 'लाडकी बहीण'मध्ये आहे. सरकारी कार्यालयांपासून सर्वसामान्यांच्या घरांपर्यंत सर्वत्र चर्चेचा विषय ठरलेला




एक महत्त्वपूर्ण विषय हसत-खेळत या चित्रपटात मांडण्यात आला आहे. आशयघन गोष्ट, उत्कंठावर्धक घडामोडी, सर्वसामान्यांच्या भावना, सुमधूर गीत-संगीत, बहारदार नृत्य, लक्षवेधी अभिनय आणि एक सशक्त संदेश देत हा चित्रपट संपूर्ण कुटुंबाचे परिपूर्ण मनोरंजन करेल असा ठाम विश्वास दिग्दर्शक शितल शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

सामाजिक विषयावर विनोदी अंगाने भाष्य करताना विषयातील गांभीर्य कायम राखण्याचे काम 'लाडकी बहीण' चित्रपटात करण्यात आले आहे. मराठीतील नामवंत कलाकारांचा अभिनय रसिकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवणारा ठरणार असून, लावणी क्वीन गौतमी पाटीलची गवळण रसिकांवर मोहिनी घालणार आहे. चिनू चेतन यांनी या चित्रपटातील गीतांची कोरिओग्राफी केली असून, संगीत विनीत देशपांडे यांनी दिले आहे. बाबा लाड, चैतन्य साळुंखे यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, गायक-संगीतकार उमेश गवळी. तसेच आनंद शिंदे व गायत्री शेलार यांच्या आवाजात 'लाडकी बहीण'मधील गाणी संगीतबद्ध करण्यात आली आहेत.

## झुरळदृश्याबद्दल प्रियोम देव गुज्जरची प्रतिक्रिया!

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर १५ मार्च -**

झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' ही मालिका भावनिक कथानक आणि गुंतागुंतीच्या पात्रांमुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधत आहे. प्रियोम देव गुज्जर साकारत असलेला राज बुंदेलाहा सुरुवातीला प्रेमळ आणि आदर्श जोडीदार म्हणून दिसतो; मात्र कथानक पुढे सरकत असताना त्याच्या प्रेमातील आसक्ती आणि मालकीभाव स्पष्ट होऊ लागतो.

अलीकडेच चित्रीत केलेल्या झुरळाच्या दृश्याबद्दल बोलताना प्रियोम म्हणाला की हेच दृश्य त्याने ऑडिशनमध्येही सादर केले होते. या प्रसंगात राज भूमिकेचे रक्षण करण्यासाठी टोकाची प्रतिक्रिया देतो, ज्यातून त्याच्या प्रेमातील तीव्रता आणि गडद पैलू समोर येतात. त्यामुळे कथानकाला नाट्यमय वळण मिळत आहे. 'लक्ष्मी निवास' सोमवार ते शुक्रवार सायं. ७ वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

**श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर**

**ई निविदा सुचना - २०२६**

श्रीच्या दर्शनरांगेत बॅरीगेटींग, तात्पुरते पत्राशेड उभारणे, विद्युत व्यवस्था व इतर अनुषंगीक कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याची सर्व माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
बांधकाम विभाग/कावि/१९/२०२६
दि.१५/०३/२०२६

**सही/-**
**कार्यकारी अधिकारी**
**(संपर्क क्र. ०२१८६-२२८८८८)**

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षेस ३१९ उमेदवारांची उपस्थिती

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ मार्च : लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ अंतर्गत प्रवर्गनिहाय एकूण ३० पोलीस शिपाई पदांसाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेचा पुढील टप्पा म्हणून घेण्यात आलेली लेखी परीक्षा रविवार दि. १५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव, लातूर येथे शांततेत व सुरळीत पार पडली. भरती प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात उमेदवारांची शारीरिक मोजमाप व शारीरिक मैदानी चाचणी ही दि. ११ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथे घेण्यात आली होती. यात यशस्वी ठरलेल्या ३२८ उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले होते. त्यापैकी ३१९ उमेदवार प्रत्यक्ष परीक्षेस हजर राहिले.

लेखी परीक्षेचे नियोजन करताना उमेदवारांची ओळख पडताळणी, बैठक व्यवस्था, परीक्षा साहित्य वितरण तसेच सुरक्षा व्यवस्था याबाबत सर्व आवश्यक खबरदारी घेण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण परीक्षा प्रक्रिया शिस्तबद्ध, पारदर्शक व सुरळीतपणे पार पडली. दरम्यान, पोलीस शिपाई पदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेची तात्पुरती उत्तरतालिका पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याशिवाय सदर उत्तरतालिका पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील दर्शनी भागावर देखील प्रदर्शित करण्यात आलेली आहे.



## विविध वृत्त...

### आजपासून शाळा सकाळ सत्रात भरणार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ मार्च : मार्च महिना सुरू झाल्याने उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. मार्चच्या मध्यातच उन्हं वाढली असून दुपारच्यावेळी प्रचंड उकाडा जाणवत आहे. शिक्षकांसह शिक्षक संघटनांनी शाळा सकाळ सत्रात कराव्यात, अशी मागणी केली होती. या मागणीस लातूर जि. प.च्या मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांनी मंजुरी दिल्याने सोमवारपासून (दि. १६) शाळा सकाळी ८ ते दुपारी १ सुरू राहतील. शनिवारी सकाळी ८ ते दुपारी साडेअकरा वाजेपर्यंत शाळा भरतील. हे बदलेले वेळापत्रक १ मे २०२६ पर्यंत लागू राहणार आहे. १५ जून २०२६ पासून शाळांची वेळ सकाळी १० ते दुपारी साडेचार अशी राहील. बऱ्याच शाळा पत्र्याच्या शेडमध्ये भरत असल्याने उन्हाचा विद्यार्थ्यांना त्रास होतो. त्यामुळे शाळांची वेळ सकाळच्या सत्रात करण्यात आली आहे. प्रशासनाच्या या निर्णयाचे शिक्षक वर्गातून स्वागत करण्यात येत आहे.

### पालकांना नोंदणीस तांत्रिक अडचण
### २५ टक्के ऑनलाईन प्रवेश नोंदणीस मुदतवाढ

तभा वृत्तसेवा

लातूर , दि. १५ मार्च : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार दुर्बल व वंचित घटकांकरिता २५ टक्के ऑनलाई न प्रवेश (२०२६-२७) नोंदणी सुरू आहे. या नोंदणीस पालकांना तांत्रिक अडचणी येत असल्याने शिक्षण संचालकांनी दि. १८ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे .

बालकांच्या पालकांकडून आरटीई २५ टक्के प्रवेश ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया १७ फेब्रुवारी २०२६ ते १० मार्च २०२६ दरम्यान, शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. आता ही मुदत १८ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. पालकांना नोंदणी करण्यास तांत्रिक अडचण येत असल्याने मुदत वाढविली आहे. १२ मार्च रोजी ४९२९ अर्ज ऑनलाईन नोंदले गेले असून, जिल्ह्यातील २०७ इंग्रजी माध्यम शाळांत २३४३ विद्यार्थ्यांचे प्रवेश २५ टक्क्यांतर्गत होणार आहेत.

### क्षयरोग निर्मूलनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ मार्च : देश क्षयरोगमुक्त करण्यासाठी सरकारी यंत्रणेबरोबर प्रत्येक डॉक्टर आणि सामाजिक संस्थेने सक्रिय सहभाग घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन लातूर परिमंडळाच्या आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी केले.

लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा क्षयरोग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्र्वसन विकार शास्त्र' विषयावर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. मंगेश सेलूकर होते. याप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, आयएमएचे अध्यक्ष डॉ. अभय कदम, डॉ. कौस्तव दासगुप्ता, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे अध्यक्ष डॉ. मन्मथ भातांब्रे, श्वसन विकार तज्ज्ञ डॉ. रमेश भराटे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आरोग्य उपसंचालक डॉ. गायकवाड म्हणाल्या, प्रत्येक वैद्यकीय अधिकाऱ्याने किमान पाच क्षय रुग्णांना फूड बास्केट देऊन मदत करावी आणि दानशूर व्यक्तींनीही पुढे यावे. यावेळी डॉ. भातांब्रे यांनी रेड क्रॉस सोसायटीच्या वतीने जिल्ह्यातील क्षय रुग्णांना जास्तीत जास्त फूड बास्केट पुरविण्याचे आश्र्वासन दिले.

यावेळी प्रा.डॉ. नामदेव सूर्यवंशी, डॉ. नीलिमा देशपांडे, डॉ. चिंचोलकर, डॉ. किरण होळीकर, डॉ. अभिजित यादव, डॉ. नम्रता आचार्य, डॉ. गणेश नरवडे, डॉ. दासगुप्ता यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. गणेश नरवडे, डॉ. मनोज कदम, डॉ. रामसिंग चंदेले, ए.एफ. गाझी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे यांनी केले.

### सेवाकुंड ट्रस्टच्या वतीने जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ मार्च : ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना आता पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागणार नाही. डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंड ट्रस्टच्या वतीने जिल्ह्या-तील रुग्णालयांमध्ये मोफत शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्याचा प्रारंभ लातूर तालुक्यातील गंगापूर येथून करण्यात आला.

शासकीय रुग्णालयात येणारा रुग्ण हा बहुतांशवेळा सर्वसामान्य स्तरातून असतो. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय नसल्याने, रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांना नाईलाजास्तव विकतचे पाणी घ्यावे लागते. पैसे देऊन पाण्याची बाटली विकत घेण्याची आर्थिक क्षमता प्रत्येक व्यक्तीची नसते. ही आर्थिक ओढताण आणि गैरसोय थांबवण्यासाठी सेवाकुंड ट्रस्टने पुढाकार घेतला आहे.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून गावातील आशा सेविका, डॉक्टर आणि परिचारिकांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. यावेळी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश दीक्षित यांनी अश्र्वजित गायकवाड यांचा सत्कार करून या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

या उपक्रमांतर्गत रुग्णालयांना शुद्ध पाण्याचे जार उपलब्ध करून दिले जाणार आहेत. उन्हाळ्याची तीव्रता पाहता ग्रामीण रुग्णांचे हाल होऊ नयेत, ही आमची भावना आहे. उन्हाळा संपेपर्यंत ही सुविधा 'सेवाकुंड'च्या वतीने अखंडितपणे दिली जाणार असल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष अश्वजित गायकवाड यांनी सांगितले.

## जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात योगदान द्या : धिरज देशमुख



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ मार्च : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची राज्यात सत्ता असो किंवा नसो, काँग्रेस पक्षाने नेहमीच ग्रामीण भागाच्या विकासात यो-गदान दिले आहे. काँग्रेस पक्षाच्या या विचारधारेनुसार सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याची भूमिका पार पाडावी असे प्रतिपादन माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांनी केले.

लातूर जिल्हा परिषद पदाधिकारी निवडीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस भवन येथे काँग्रेस पक्षाच्या जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्यांची बैठक लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, माजी आमदार धिरज देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस अभय साळुंके, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, प्रदेश सचिव कल्याण पाटील, गटनेत्या आशाताई भिसे, मुख्य प्रतोद सोना-ली थोरमोटे, प्रतोद औदुंबर पांचाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना धिरज देशमुख म्हणाले की , काँग्रेस हा नेहमीच शेतकरी, कामगार, युवक, महिला व सर्वसामान्य जनतेच्या हिता-चा विचार करणारा पक्ष असून स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत देशाच्या आणि राज्याच्या उभारणीत काँग्रेसचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. सत्ता असो किंवा नसो काँग्रेस कायम सर्वसामान्यांच्या हिताच्या बाजूने उभा आहे. ग्रामीण भागातील रस्ते, पथदिवे, पाणी पुरवठा, शिक्षण, आरोग्य, कुक्षी, क्रीडा, उद्योग, सहकार क्षेत्राच्या विकासात काँग्रेस पक्षाची भूमिका मोलाची राहिली आहे.

त्यामुळे नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेने काँग्रेसला भरभरून मतदान केले. सहकार महर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्ष सर्वाधिक जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला. जनतेने भरघोस मते देऊन दाखवलेला विश्र्वाससार्थ ठरवण्यासाठी आपण सर्वांनी यापुढे प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे, असे देशमुख यांनी सांगितले. आगामी काळात जिल्हा परिषदेमार्फत जनतेच्या प्रश्र्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती देण्याबाबतही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

## राज प्रतिष्ठानने माणुसकीचा वस्तुपाठ उजळ केला : जिल्हाधिकारी
### १०१ मुस्लिम परिवारांना ईदचा शिधा वाटप

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ मार्च : शरीर व आत्म्याची शुध्दी करणारा पवित्र महिना म्हणजे रमजान अन त्यापाठोपाठ येणारी ईद म्हणजे बंधुभाव जपणारा अन सर्वांच्या कुशल मंगलाची कामना करणारा सण आहे. या सणासाठी राज प्रतिष्ठानने जपलेली बांधिलकी ही माणुसकीचा वस्तुपाठ उजळ करणारा आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी केले.

राजप्रतिष्ठानच्या वतीने ईस्लामपूरा भागातील १०१ गरजू मुस्लीम परिवारांना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते ईदसाठी शिधा वाटप करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, ॲड. वैशाली वीरकर सूर्यवंशी, अभिजीत देशमुख, हंसराज जाधव, डी.एस पाटील ,ॲड. शिवकुमार जाधव, कैलास कांबळे, ॲड. नरेंद्र शिंदे ,विश्र्वजित वलाकडे, प्रमोद उटगे, राहुल पाटील, कलीम शेख, अल्ताफ पठाण इम्रान शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी म्हणाल्या उपवासाने शरीराची तर सदविचाराने मनाची शुध्दी होते व तन आणि मन शुध्द झाल्यास जीवन समाधानी होते. सामाजिक सलोखा जपण्यातही लातूर शहराने आपली स्वतंत्र ओळख दिली आहे. या क्षेत्रातही लातूरने लातूर पॅटर्न निर्माण केला आहे. इथे नांदत असलेले सामाजिक ऐक्य, बंधुता अन मानवता ही त्याची साक्ष असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाल्या. राज प्रतिष्ठान करीत असलेल्या कार्याचा अन राबवत असलेल्या उपक्रमाचे कौतूक करीत त्यांना सर्वांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी प्रतिष्ठानच्या कार्य व उपक्रमाची विस्ताराने माहिती दिली.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शिधा वाटप करण्यात आले. सामाजिक योगदानाबदद्ल डॉ. हर्षवर्धन राऊत यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सुत्रसंचलन डी.एस. पाटील यांनी केले. आभार हंसराज जाधव यांना मानले.

## 'निपुण महाराष्ट्र अभियान' अंतर्गत जि. प. च्या ५६ 'निपुण' शाळांचा गौरव



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ मार्च : जिल्हा परिषद लातूरच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत आयोजित कार्यक्रमात 'निपुण महाराष्ट्र अभियान' अंतर्गत जिल्ह्यातील १०० टक्के निपुण ठरलेल्या ५६ शाळांचा गौरव केला. यावेळी जि. प. व पुण्याच्या ओपन लिंक्स फाऊंडेशनच्या वतीने शिक्षकांसाठी 'आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम' या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन झाले.

यावेळी सीईओ राहुलकुमार मीना, शिक्षणाधिकारी (प्रा.) तृप्ती अंधारे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यात १०० टक्के निपुणता प्राप्त करणाऱ्या ५६ शाळांच्या मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान केला. सीईओ मीना यांनी ५६ निपुण शाळांचे कौतुक करून इतर जि. प. शाळाही १०० टक्के निपुण करण्याचे आवाहन केले. शिक्षकांनी तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यांची गुणवत्ता वाढविणे हा 'विनोबा' उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत डिजिटल प्लॅटफॉर्म, स्पर्धा परीक्षा सराव, शिक्षकांना प्रोत्साहन, असे निरनिराळे कार्यक्रम, उपक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती शिक्षणाधिकारी (प्रा.) तृप्ती अंधारे यांनी दिली. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या कामाला या माध्यमातून जिल्हास्तरावर ओळख व प्रोत्साहन मिळणार आहे. 'गुढी पाडवा पट वाढवा' मोहिमेबाबत आ-वाहन केले आहे.

पुढील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी संख्या वाढविण्याच्या उद्देशाने सर्व शाळांनी 'गुढी पाडवा - पट वाढवा' हे विशेष अभियान राबवावे, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांनी दिल्या. शिक्षकांनी थेट पालकांशी संवाद साधून जि. प. शाळांतील प्रवेश वाढवावेत, असेही त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविकात शिक्षणाधिकारी (प्रा.) तृप्ती अंधारे म्हणाल्या, 'विद्यार्थी हेच दैवत' माणून काम करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी समर्पित भावनेने काम करण्याचे आ-वाहन त्यांनी केले.

शिक्षकांसाठी' आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम 'आयोजिला असून, त्याचे उद्घाटन शुक्रवारी झाले. विनोबा ॲपचा शुभारंभ करण्यात आला असून, शाळांतर्गत घेतल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती, नवोदय व एनएमएमएस परीक्षांच्या सरावास डिजिटल सहकार्य व शैक्षणिक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन देण्यात येणार आहे. गुढी पाडव्यापासून ते शाळेच्या पहिला दिवस शाळा प्रवेशोत्सवापर्यंत सर्व जि. प. शाळांनी प्रवेश वाढीसाठी प्रयत्न करावे. सर्व जिल्हा परिषद शाळांनी 'माझी शाळा १०० टक्के निपुण शाळा' जाहीर करण्याचे आ-वाहन याप्रसंगी करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपस्थित होते.

## गॅस सिलेंडरचा साठा आणि पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासन'ॲक्शन मोड'वर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ मार्च : इराण-इस्राईल युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यात कोणतीही टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी राज्य शासनाच्या निर्देशान-सार लातूर जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना हाती घेतल्या आहेत.



जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी पुरवठा विभागाचा आढावा घेऊन घर-गुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार आणि व्यावसायिक वापर रोखण्यासाठी कडक पावले उचलण्याच्या सूचना दिल्या आ-हेत. तसेच गॅस पुरवठ्याबाबत काही तक्रार किंवा समस्या असल्यास नागरिकांनी जिल्हा प्रशासनाच्या ९८९००८४१६८ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गॅस पुरवठा साखळीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर सनियंत्रण व मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तसेच, जिल्ह्यातील गॅस एजन्सींच्या साठा तपासणीसाठी आणि गैरप्रकार रोखण्यासाठी १० विशेष भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. ही पथके जिल्ह्यातील गॅस एजन्सीला, गॅस गोडावूनला 'सरप्राईज व्हिजिट' देऊन गॅस सिलेंडर साठ्याची तप-ासणी करतील. तसेच घरगुती गॅसचा व्यावसायिक कारणांसाठी वापर होत असल्यास संबंधितांवर कारवाई करतील, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रा-वलोड यांनी दिली आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सीधारकांची बैठक घेण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्व घरगुती ग्राहकांना प्राधान्याने सिलेंडर पुरवठा करावा. एका कनेक्शन धारकाला २५ दिवसांच्या आत दु-सरे सिलेंडर दिले जाऊ नये. तसेच, वितरण केवळ फर्स्ट इन फर्स्ट आऊट' आणि ओटीपी आधारित करावे. गॅस कंपनीने निश्र्चित केलेल्या दरापेक्षा जास्त रक्कम आकारू नये. घरगुती सिलेंडरचा व्यावसायिक वापर केल्यास किंवा काळाबाजार केल्यास अत्यावश्यक वस्तू कायद्यानुसार थेट गुन्हा दाखल करण्यात येईल. एजन्सीधारकांनी दररोजचा साठा प्रशासनाला सादर करणे अनिवार्य आहे. स्टॉक असतानाही हेतुपुरस्सर डिलिव्हरी न केल्यास कडक कारवाई होईल. सर्व गॅस एजन्सी नियमित वेळेनुसार उघड्या ठेवाव्यात, विनाकारण एजन्सी बंद ठेवू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

## पंजाबराव देशमुख वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता द्या



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ मार्च : लातूर जिल्ह्यातील पंजाबराव देशमुख वसतिगृहात प्रवेशास पात्र विद्यार्थ्यांना मागील अनेक महिन्यांपासून निर्वाह भत्ता मिळालेला नाही. त्यामुळे तात्काळ निर्वाह भत्ता द्यावा, अशी मागणी व्हीएस पँथर्सचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या सूचनेनुसार विद्यार्थी आघाडीने निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निर्वाह भत्ता न मिळाल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तात्काळ निर्वाह भत्ता खात्यावर अदा करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा

इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे, जिल्हा उपाध्यक्ष महादेव कांबळे, सूरज कांबळे, शहर सचिव रोहित दंडे, शहर संघटक रोहित जांभळे,

सुदर्शन ओव्हळ, दीपक मनोहर, विश्र्वनाथ गायकवाड, माऊली गोबाडे, शिवम जाधव, हर्षवर्धन लोकरे, शिवाजी पवार, महेश पवार आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## बाभळगाव येथे 'महाराजस्व अभियान समाधान शिबिरा'चे उद्घाटन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मार्च : प्रशासकीय यंत्रणेने अधिक दक्ष राहून शासन लोकाभिमुख आणि गतिमान असल्याचे आपल्या कार्यातून सिद्ध करावे, असे आवाहन आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले. शासनाच्या सर्व योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेला मिळावा आणि आवश्यक कागदपत्रे सहज उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान २०२६' अंतर्गत बाभळगाव येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन यांच्या हस्ते पार पडले, यावेळी ते बोलत होते.

या अभियानांतर्गत लातूर तालुक्यातील बाभळगाव येथे आयोजित 'समाधान शिबिरा'चे उद्घाटन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षा-चे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर दीप प्रज्वलनाने शिबिराचा अधिकृत प्रारंभ झाला. यावेळी आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात लाभ वाटप व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी त्यांनी महसूल विभागाने लावलेल्या विविध योजनांच्या स्टॉल्सला भेट देऊन माहिती घेतली. यावेळी पूढे बोलताना या अभियानाच्या निमित्ताने प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांनी अत्यंत दक्ष राहून, शासन खरोखरच लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान असल्याचे आपल्या कामातून दाखवून द्यावे. तसेच विविध संस्थांमधील लोकप्रतिनिधींनीही या अभियानाच्या आणि शिबिरांच्या माध्यमातून जनतेचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी केले. महसूल, भूमी अभिलेख, कृषी, सहकार, बँकिंग, पुरवठा यांसह इतर सर्वच विभागांच्या विविध योजनांचा लाभ गरजू लाभार्थ्यांना मिळावा; तसेच आधार कार्ड, मतदान कार्ड यांसह सर्व प्रकारची प्रमाणपत्रे सहजगत्या उपलब्ध व्हावीत यासाठी हे अभियान अत्यंत महत्त्वाचे आहे. विविध महसूल मंडळांच्या ठिकाणी आयोजित करण्यात येत असलेल्या या शिबिरांचा जनतेला मोठा लाभ होईल, असा विश्र्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तह-सीलदार सौदागर तांदळे, जिल्हा परिषद सदस्य महादेव मस्के, लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण, पंचायत समिती सदस्य प्रिया उपाडे, पूजा जाधव, बाभळगाव ग्रामपंचायतच्या प्रशासक प्रिया सचिन मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी सागर मुळीक, नायब तहसीलदार सुधीर देशमुख, मंडळ अधिकारी सुनील लाडके यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रोखठोक

# स्वार्थ, सहकार्य आणि संस्कृतीचा संघर्ष

**दिनेश गुणे**

कोणत्याही एखाद्या जागतिक अपरिहार्य परिस्थितीमुळे उद्भवणाऱ्या सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिक संघर्षाच्या काळात कसोटीच्या अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते. ही कसोटी राज्यकर्त्या सरकारांची तर असतेच, पण अशा प्रत्येक कसोटीच्या क्षणी केवळ सरकारकडे बोट दाखवून बघ्याची भूमिका घेणे समाजाकडूनही अपेक्षित नसते. याआधी भारतासमोर अनेक संकटांच्या रूपाने अशीच अनेक आव्हाने उभी राहिली, तेव्हा समाजाने संघटितपणे समस्यांशी संघर्ष केला. कोणत्याही व्यापक समस्येचा सामना करावयाचा असेल, तर एकाकीपणे ते शक्य होत नाही. कारण अशा समस्या कोणा एका व्यक्तीपुरत्या, सरकारपुरत्या मर्यादित नसतात. संपूर्ण समाजाला त्यांचे चटके सोसावे लागतात आणि अशा प्रसंगी अन्य सामाजिक किंवा सांस्कृतिक वाद विसरून सामूहिकपणे त्यांना सामोरे जावेच लागते. किंबहुना, अशा प्रसंगात समाजाच्या संघटित शक्तीची खरी परीक्षा होत असते. सध्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या दरम्यान सुरू असलेल्या भीषण संहारक युद्धाचे परिणाम संपूर्ण जगाला दिसू लागले आहेत. जगाच्या इंधनाची गरज भागविण्यात मोठा वाटा असलेल्या इराणने इंधनपुरवठ्याबाबत उभ्या जगाला वेठीस धरण्याच्या धोरणातून अमेरिका-इस्रायलवर जागतिक दबाव आणण्याची नीती आखल्याचे दिसत आहे. अशा काळात, भारतामध्ये उद्भवलेली स्थिती काहीशी संभ्रमाची दिसते. स्वयंपाकाचा गॅस आणि इंधनाचे तेल पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून त्याचा पुरेसा साठादेखील आहे, अशी ग्वाही केंद्र सरकार देत असतानाही, गावोगावी गॅस सिलेंडरची टंचाई, महागाई, काळाबाजार आदींमुळे ग्राहकांची वणवण सुरू असलेली दिसते. कोणत्याही सार्वत्रिक संकटाच्या काळात स्वार्थ साधावयाचा की सहकार्यातून समस्येशी सामना करावयाचा यावर सामाजाची संस्कृती दिसत असते. भारताने सहकार्याचे दर्शन घडवून अनेक समस्यांशी सामना केल्याने, हीच समाजाची संस्कृती असल्याचे वारंवार उघडही झाले आहे. आताच्या परिस्थितीतही, समाजाकडून तेच अपेक्षित आहे आणि समाजाची मानसिकतादेखील तशीच आहे. तरीही, निव्वळ राजकीय स्वार्थापायी संभ्रम माजविण्याचे प्रयत्न काही राजकीय पक्ष आणि त्यांचे पाठीराखे करत असतील, तर तो सामाजिक संस्कृतीचा आणि सहकार्याच्या परंपरेचा पराभव ठरेल. तसे व्हावयास नको. कारण संस्कृती, सहकार्य आणि स्वार्थ यांच्यातील या संघर्षाच्या क्षणी समाजाची भूमिका महत्त्वाची ठरते.

देशात एलपीजी गॅस किंवा पेट्रोलियम उत्पादनांचा तुटवडा नाही, अशी ग्वाही केंद्र सरकारकडून वारंवार दिली जात आहे. या उत्पादनांचे पुरेसे साठे उपलब्ध असल्याचे केंद्र सरकारकडूनही सांगितले जाते. मात्र वास्तवात अनेक शहरांत आणि गावांत ग्राहकांना गॅस सिलेंडरसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. नोंदणी केल्यानंतर सिलेंडर उशिरा मिळणे, वितरकांकडे स्टॉक संपल्याची माहिती देणे किंवा वितरणासाठी विलंब होणे अशा तक्रारी सर्वत्र ऐकू येत आहेत.

जर देशात गॅसचा तुटवडा नाही, तर ग्राहकांना टंचाई का जाणवते, या प्रश्नाचे उत्तर शोधताना उत्पादन, आयात, वितरण व्यवस्था आणि स्थानिक पातळीवरील व्यवस्थापन या सर्व बाबींकडे पाहावे लागते. भारतातील एलपीजी पुरवठा ही अत्यंत मोठी आणि गुंतागुंतीची यंत्रणा आहे. रिफायनरी किंवा आयात बंदरांमधून गॅस बॉटलिंग प्लांटमध्ये पोहोचतो, तेथून सिलेंडर भरून ते वितरकांकडे पाठवले जातात आणि शेवटी ग्राहकांच्या घरापर्यंत पोहोचतात. या साखळीतील कोणत्याही टप्प्यावर अडथळा निर्माण झाला, तर स्थानिक पातळीवर टंचाईची भावना निर्माण होते. भारत 'एलपीजी'च्या गरजेसाठी मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून आहे. देशातील एकूण वापरापैकी जवळपास दोनतृतीयांश गॅस परदेशातून येतो. जागतिक बाजारातील चढ-उतार, जहाजांच्या हालचालीतील विलंब किंवा आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील अडथळे यांचा परिणाम कधीकधी स्थानिक पुरवठ्यावर होतो. मात्र अशा परिस्थितीतही देशाच्या पातळीवर साठे पुरेसे असतात. त्यामुळे सरकार 'तुटवडा नाही' असे सांगते, परंतु काही प्रदेशांमध्ये वितरणात अडथळे निर्माण होऊ शकतात. मागणीतील अचानक वाढ हे यामागील एक महत्त्वाचे कारण असते. सणासुदीचा काळ, लग्नसराईचा हंगाम किंवा सध्या सर्वत्र दिसत असलेल्या युद्धस्थितीमुळे निर्माण झालेल्या मानसिक दबावामुळे घरगुती वापरात अचानक वाढ झाली, तर काही दिवसांसाठी मागणी आणि पुरवठा यामध्ये तफावत निर्माण होते. विशेषतः शहरांमध्ये किंवा वाढत्या उपनगरांमध्ये लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने वितरण व्यवस्थेवर ताण येतो. वितरकांकडे मर्यादित साठा असतो; त्यामुळे मागणी वाढली की काही काळ टंचाई जाणवते. काही वेळा कृत्रिम टंचाईची शक्यताही नाकारता येत नाही. घरगुती वापरासाठी असलेले सिलेंडर व्यावसायिक वापरासाठी वळवले जाणे, साठेबाजी किंवा काळाबाजार यांसारख्या प्रकारांमुळे ग्राहकांना त्रास सहन करावा लागतो. प्रशासनाने वेळोवेळी अशा प्रकारांवर कारवाई केली असली, तरी वितरण व्यवस्थेतील पारदर्शकता अजूनही पूर्णपणे प्रस्थापित झालेली नाही.

भारतात अशा प्रकारची परिस्थिती यापूर्वीही दिसून आली आहे. २०१३- १४ च्या काळात घरगुती गॅस सिलेंडरवरील अनुदान मर्यादित करण्याच्या निर्णयानंतर अनेक भागांत सिलेंडर मिळण्यास विलंब होत होता. त्या वेळी नोंदणीनंतर दीर्घ प्रतीक्षा, वितरकांकडे पुरेसा साठा नसणे आणि काळाबाजाराच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर झाल्या होत्या. त्यानंतर वितरण प्रणाली सुधारण्यासाठी काही उपाययोजना करण्यात आल्या. नंतर कोविड महामारीच्या काळातही काही शहरांमध्ये अशीच स्थिती निर्माण झाली होती. टाळेबंदीमुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आणि घरगुती वापर अचानक वाढला. परिणामी काही दिवस सिलेंडर पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले. तथापि प्रशासन आणि तेल कंपन्यांनी समन्वय साधून ही परिस्थिती लवकर नियंत्रणात आणली. आजच्या परिस्थितीत मात्र समस्या थोडी वेगळी आहे. देशातील



ऊर्जा गरजा झपाट्याने वाढत आहेत. ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर एलपीजी जोडण्या उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे वितरण व्यवस्थेवर पूर्वीपेक्षा अधिक दबाव आहे. नवीन ग्राहक वाढले, तर त्या वेगाने बॉटलिंग प्लांट, वाहतूक व्यवस्था आणि वितरकांचे जाळे यांचा विस्तार व्हावयास हवा. तो तसा नसेल, तर काही भागांत तात्पुरती टंचाई निर्माण होते. म्हणून, वितरण साखळी अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक असणे गरजेचे असते. बॉटलिंग प्लांटची क्षमता वाढवणे, वाहतुकीसाठी स्वतंत्र व्यवस्था विकसित करणे आणि वितरकांचे जाळे मजबूत करणे, डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून सिलेंडरचा पुरवठा आणि साठा याबाबत ग्राहकांना अचूक माहिती मिळेल, अशी व्यवस्था निर्माण करणेही महत्त्वाचे आहे. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने दीर्घकालीन उपाययोजनाची गरजही या निमित्ताने स्पष्ट झाली आहे. एलपीजी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादन वाढवणे, पर्यायी इंधनांचा वापर प्रोत्साहित करणे आणि स्वच्छ ऊर्जेच्या नव्या स्रोतांकडे वळणे या बाबी भविष्यासाठी महत्त्वाच्या ठरणार आहेत.

सद्यःस्थितीत, गॅसचा तुटवडा नसतानाही ग्राहकांना जाणवणारी टंचाई हे मुख्यतः व्यवस्थेतील त्रुटींचे लक्षण असावे. पुरवठा पुरेसा असूनही वितरणात गोंधळ निर्माण झाला, तर नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे ही समस्या केवळ आकडेवारीच्या आधारावर नाकारण्यापेक्षा तिच्या मूळ कारणांकडे पाहून दीर्घकालीन उपाय शोधणे हीच खरी प्रशासनाची कसोटी ठरणार आहे. कारण, अन्नधान्य, इंधन, गॅस किंवा इतर जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली की सर्वप्रथम शासनव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचा प्रश्न उभा राहतो. सरकारने योग्य नियोजन केले का, पुरवठा साखळी व्यवस्थित आहे का, साठेबाजीवर नियंत्रण आहे का, अशा अनेक प्रश्नांची चर्चा सुरू होते. ही चर्चा योग्यच असते, कारण जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर शासनावरच असते. मात्र प्रत्येक संकट समाजालाही एक आरसा दाखवत असते. टंचाईच्या काळात समाजाचे वर्तन कसे असते, यावरही परिस्थिती किती गंभीर बनेल हे अवलंबून असते. म्हणूनच अशा प्रसंगी ही केवळ प्रशासनाची नव्हे तर समाजाचीही कसोटी ठरते. कारण कृत्रिम टंचाई किंवा काळाबाजार ही केवळ प्रशासनातील त्रुटीमुळे निर्माण झालेली समस्या नसते. अनेकदा समाजातील काही घटक त्यातून फायदा मिळवण्याचा प्रयत्न करतात. एखाद्या वस्तूची मागणी वाढली की काही व्यापारी किंवा वितरक साठेबाजी करतात. पुरवठा कमी असल्याचा आभास निर्माण करून ते वस्तू जास्त किमतीत विकण्याचा प्रयत्न करतात. या प्रक्रियेत सामान्य ग्राहक अडचणीत येतो. अनेकदा, ही परिस्थिती टिकून राहण्यामागे ग्राहकांचेही काही प्रमाणात थेट किंवा अप्रत्यक्ष योगदान असते. टंचाईची बातमी पसरताच अनेक लोक गरजेपेक्षा जास्त वस्तू साठवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. 'पुढे काय होईल सांगता येत नाही' या भीतीने ते एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात. परिणामी बाजारातील उपलब्ध साठा झपाट्याने कमी होतो. जेव्हा सर्व जण अशाच पद्धतीने वागतात, तेव्हा प्रत्यक्षात पुरवठा पुरेसा असतानाही टंचाईचे चित्र निर्माण होते. म्हणजेच भीती आणि असुरक्षिततेची भावना स्वतःच टंचाईला कारणीभूत ठरते. काळाबाजाराच्या बाबतीतही असेच दिसून येते. व्यापाऱ्यांनी जादा दराने वस्तू विक्रीस काढल्या, तर ग्राहकांनी त्या विकत घेऊ नयेत, ही अपेक्षा स्वाभाविक आहे. पण प्रत्यक्षात अनेकदा ग्राहक गरजेपोटी किंवा घाईत जादा किंमत देण्यास तयार होतात. त्यामुळे काळाबाजाराला प्रोत्साहन मिळते. जादा दराने विक्री करूनही ग्राहक मिळत असतील, तर साठेबाजी करणाऱ्यांना आळा बसण्याचे कारण राहत नाही. त्यामुळे समाजातील ग्राहकवर्गही या प्रक्रियेत अप्रत्यक्षपणे सहभागी ठरतो.

अशा परिस्थितीत समाजाची समंजस आणि संयमी भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. ग्राहकांची सामूहिक भूमिका बाजारव्यवस्थेवर मोठा परिणाम करू शकते. लोकशाही व्यवस्थेत नागरिक हे केवळ 'ग्राहक' नसतात; ते जबाबदार घटकही असतात. संकटकाळात सामाजिक संवेदनशीलता अधिक महत्त्वाची ठरते. समाजातील काही घटक आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात. त्यांच्यासाठी जीवनावश्यक वस्तू मिळवणे अधिक कठीण असते. त्यामुळे सक्षम घटकांनी गरजेपेक्षा जास्त साठा करण्यापेक्षा इतरांचाही विचार करणे ही सामाजिक जबाबदारी आहे. शासनाने कठोर नियंत्रण, पारदर्शक पुरवठा व्यवस्था आणि प्रभावी कारवाई केली पाहिजे; पण त्याचबरोबर समाजानेही संयम, प्रामाणिकता आणि सहकार्याची भूमिका घेतली तरच अशा संकटांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते.

म्हणूनच टंचाईचा काळ हा केवळ पुरवठा व्यवस्थेची परीक्षा नसतो; तो समाजाच्या संस्कारांची आणि सामूहिक जबाबदारीचीही कसोटी असतो. संकटाच्या क्षणी आपण स्वार्थाचा मार्ग निवडतो की सामाजिक उत्तरदायित्वाचा यावरच त्या समाजाची खरी ओळख ठरते. भाषा, धर्म, संस्कृती, आर्थिक स्तर आणि जीवनशैली यांच्या वैविध्यामुळेच भारतीय समाजात परस्परविरोधी प्रवृत्ती एकाच वेळी दिसतात. एका बाजूला सहकार्य, परस्पर मदत आणि सामाजिक संवेदनशीलता दिसते; तर दुसऱ्या बाजूला स्वार्थ, स्पर्धा आणि वैयक्तिक हिताला प्राधान्य देणारी मानसिकताही दिसून येते. त्यामुळेच संकटाच्या काळात भारतीय समाज अनेकदा स्वार्थ आणि सहकार्य दोन प्रवृत्तींच्या संघर्षातून जाताना दिसतो.

भारतीय समाजजीवनात 'वसुधैव कुटुंबकम्' किंवा 'सर्वे भवन्तु सुखिनः' यासारख्या संकल्पना रुजलेल्या आहेत. गावपातळीवरील सहकार, उत्सव-परंपरा आणि सामाजिक बांधिलकी यांमधून परस्पर मदतीची भावना व्यक्त होत आलेली आहे. आपत्तीच्या प्रसंगी ही भावना अधिक ठळकपणे दिसते. मात्र याच समाजात, संकटाच्या काळात वैयक्तिक फायद्यासाठी परिस्थितीचा गैरफायदा घेणारा वर्गही दिसतो. जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी, जादा दराने विक्री, काळाबाजार अशा घटना अधूनमधून घडत असतात. या विरोधाभासामागेही, प्रचंड लोकसंख्या आणि आर्थिक विषमतेसारखी कारणे आहेतच! भविष्यातील असुरक्षिततेची व अनिश्चिततेची भीती वाढली की स्वार्थाची प्रवृत्ती अधिक आक्रमक होते. आता तर, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अफवांचा वेगाने होणारा प्रसार ही एक मोठी समस्या बनली आहे. अनेकदा या अफवांमुळे घबराट निर्माण होते आणि लोक अनावश्यक खरेदी किंवा साठेबाजी करतात. त्यामुळे परिस्थिती आणखी बिघडते.

तथापि या सर्व विरोधाभासांनंतरही भारतीय समाजात सकारात्मक बदलांची चिन्हे दिसत आहेत. शिक्षणाचा प्रसार, नागरिकांमधील जागरूकता आणि सामाजिक जबाबदारीची भावना वाढत असल्याने अनेक लोक अशा प्रसंगी संयमाने वागण्याचा प्रयत्न करतात. काही ठिकाणी नागरिक संघटना आणि स्वयंसेवी गट प्रशासनाला मदत करून पुरवठा व्यवस्थेतील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच समाजातील सहकार्याची प्रवृत्ती पूर्णपणे दुर्बल झालेली नाही. म्हणूनच, सध्याच्या कसोटीच्या प्रसंगात या एक महत्त्वाचा सामाजिक प्रश्न उग्र होताना दिसत आहे. समाजात स्वार्थ आणि सहकार्य या दोन्ही प्रवृत्ती असतील, तर त्यांच्या संघर्षाच्या या काळात, कोणती प्रवृत्ती अधिक प्रभावी ठरणार, याचे उत्तर समाजातील सामूहिक संस्कारांवर अवलंबून असते. नागरिकांनी संयम, प्रामाणिकता आणि सामाजिक उत्तरदायित्व या मूल्यांना प्राधान्य दिले, तर सहकार्याची प्रवृत्ती मजबूत होईल. उलट वैयक्तिक फायद्याला सर्वोच्च महत्त्व दिले, तर स्वार्थी प्रवृत्ती बळावतील. म्हणूनच समाजाच्या भविष्यासाठी केवळ आर्थिक विकास पुरेसा नाही. सामाजिक मूल्यांची जपणूकही तितकीच आवश्यक आहे. नागरिकांमध्ये जबाबदार वर्तनाची जाणीव निर्माण करणे, अफवांपासून सावध राहणे आणि संकटकाळात एकमेकांना मदत करणे हीच खरी सामाजिक प्रगतीची चिन्हे आहेत. संकटाच्या क्षणी आपण कोणती भूमिका निवडतो, यावर त्या समाजाचे नैतिक सामर्थ्य ठरते. म्हणूनच प्रत्येक संकट हा समाजाला स्वतःकडे पाहण्याचा आणि आपली मूल्ये तपासण्याचा एक महत्त्वाचा क्षण ठरतो.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### जग अस्थिरतेच्या भोवऱ्यात

मध्यपूर्वेच्या वाळवंटात पेटलेल्या युद्धाचा आगडोंब आता प्रादेशिक संघर्षापुरताच मर्यादित न राहता ती जागतिक अर्थकारण, ऊर्जा सुरक्षा आणि महासत्तांच्या प्रतिष्ठेचा झाला आहे. अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर उफाळलेला संताप आता आखाती देशांच्या दारात पोहोचला आहे. होर्मूझची सामुद्रधुनी बंद करण्याची इराणच्या क्रांतिकारी रक्षकांची घोषणा ही केवळ धमकी नसून जगाची आर्थिक कोंडी करण्याची चाल आहे. जगातील बहुतांश देशांना



कच्च्या तेलाचा पुरवठा ज्या अरुंद समुद्रमार्गातून होतो तो होर्मूझ मार्ग थांबला तर त्याचे मोठे परिणाम आखातापुरते मर्यादित न राहता आशियाई अर्थव्यवस्था, विशेषतः चीन, भारत, जपान या प्रमुख देशांना मोठा फटका बसू शकतो. युद्धाच्या तीन दिवसांतच कच्च्या तेलाच्या किमती सहा टक्क्यांहून अधिक वाढल्या आहेत. नैसर्गिक वायूच्या दराने पन्नास टक्क्यांपर्यंत उसळी घेतली आहे. महागाईचा भडका, इंधनटंचाई आणि शेअर बाजारातील मोठी घसरण ही केवळ सुरुवात असू शकते.

इराणने थेट अमेरिका किंवा इस्रायलऐवजी आखाती देशांतील कुवेत, कतार, बहरीन, यूएई, सौदी अरेबिया या देशांच्या आर्थिक धमन्यांवर प्रहार करून अमेरिकेवर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण ही चाल दुधारी तलवार ठरू शकते. कारण या हल्ल्यांमुळे गल्फ को-ऑपरेशन कौन्सिलमधील देश अमेरिकेकडे अधिक झुकू लागले आहेत. सामूहिक संरक्षणाच्या नावाखाली नव्या आघाड्या तयार होत आहेत. तणाव शिगेला पोहोचत आहे. जग आधीच अस्थिरतेच्या भोवऱ्यात अडकले आहे. रशिया-युक्रेन युद्ध अजूनही थांबलेले नाही. आशियात सीमावाद धगधगत आहेत. गाझा पट्टीतील संघर्ष ताजा आहे. अशावेळी आखातातील ही ज्वाला तिसऱ्या महायुद्धाची चाहूल देत आहे.

महासत्तांच्या अहंकाराच्या लढाईत सामान्य नागरिकांचे प्राण, अर्थव्यवस्थांची कंबर आणि भविष्यातील पिढ्यांचे स्वप्न तुटण्याची भीती आहे. तेलसाठ्यांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा अमेरिकेववर आरोप होत असताना, इराणही आंतरराष्ट्रीय जलमार्ग बंद करण्याची धमकी देऊन जागतिक कायद्याला आव्हान देत आहे. जर हा मार्ग खरोखर बंद झाला, तर केवळ तेल नव्हे तर संपूर्ण जागतिक पुरवठा साखळीच विस्कळीत होईल. त्याचे मोठे पडसाद भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेत तीव्रतेने उमटतील. यामध्ये भारताची भूमिका महत्त्वाची ठरते. पारंपरिक तटस्थेचा मार्ग स्वीकारत शांततेचे आवाहन करणे आणि युद्धजन्य प्रदेशात अडकलेल्या भारतीयांना सुरक्षित परत आणणे या जबाबदाऱ्या कसोटीच्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखविलेली तत्परता दिलासादायक असली, तरी ऊर्जा सुरक्षेसाठी पर्यायी मार्ग, इंधनाचा साठा करणे आणि नूतनीकरणीय ऊर्जेकडे झपाट्याने वळणे ही काळाची गरज ठरते. युद्ध कोण जिंकणार हा प्रश्न दुय्यम आहे, कारण हरले जाणार आहे ते मानवतेचे भविष्य, महायुद्धे जिंकली जातात रणांगणांवर, पण त्यांची किंमत भरावी लागते पिढ्यानपिढ्या. होर्मूझच्या लाटीवरून उठलेली ही धग जर वेळीच शांत झाली नाही, तर जग अंधाराकडे वाटचाल करेल. आज गरज आहे ती अहंकार नव्हे, तर संवादाची, क्षेपणास्त्राची नव्हे, तर कूटनीतीची. अन्यथा पेटलेल्या या ज्वालेत केवळ आखात नव्हे संपूर्ण जग भस्मसात होण्याची भीती नाकारता येणार नाही.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### संवाद हा नात्याचा पाया

नातेसंबंध म्हणजे दोन व्यक्तींमधील बंधन. हे बंधन प्रेम, आपुलकी, जबाबदारी, अपेक्षा आणि समर्पण यावर उभं असतं. पण या सगळ्याच्या मुळाशी असणारा संवाद हा नात्याचा पाया आहे. संवादाच्या अभावामुळे कित्येक सुंदर नाती विस्कटून जातात तर संवाद योग्य पद्धतीने झाल्यास कोणत्याही अडचणींवर मात करता येते. कोणत्याही नात्यात विश्वास टिकवण्यासाठी आणि एकमेकांना समजून घेण्यासाठी संवाद आवश्यक असतो. जेव्हा पती व पत्नी ही माणसं प्रामाणिक आणि गंभीरपणे संवाद साधू शकतात, तेव्हा ते एकमेकांचे सर्वोत्तम मानसशास्त्रज्ञ ठरू शकतात. कित्येक वेळा लोक नातेसंबंधांच्या गुंतागुंतीबद्दल तक्रार करतात. खरा प्रश्न हा असतो की आपण एकमेकांशी स्पष्ट आणि मोकळेपणाने बोलतो का? संवादाचा अर्थ फक्त बोलणे एवढाच नसतो तर ऐकणे, समजून घेणे, भावनांचा सन्मान करणे आणि उत्तरदायित्व स्वीकारणे तितकेच महत्त्वाचे असते. एकमेकांना वेळ न देणे, संवाद टाळणे, अपुऱ्या माहितीवरून निष्कर्ष काढणे हे सर्व नात्यातील कटूता वाढवते. अनेकदा लोक भांडण करताना आरोप-प्रत्यारोप करतात. पण जर दोघांनी शांतपणे एकमेकांचे म्हणणे ऐकले, तर हा दुरावा मिटू शकतो. कधी कधी लोक नात्यातील संवाद टाळतात. त्यांना वाटतं की, जर मी खरं बोललो तर समोरचा दुखावला जाईल; पण हे चुकीचे आहे. नात्यात प्रामाणिकता हवी असेल, तर आपण आपल्या भावना व्यक्त करायला पाहिजे. आपल्याला काय हवे आहे, हे स्पष्ट सांगितलं पाहिजे आणि आपण समोरच्याकडून काय अपेक्षा करता हे स्पष्ट सांगितलं पाहिजे. आपल्या मनातील खऱ्या भावना लपवून न ठेवता बोललं पाहिजे. जर एखाद्या व्यक्तीला काही त्रास होत असेल, पण ती ते बोलत नसेल तर समोरचा कसा समजून घेणार? नात्यात अनेक समस्या असू शकतात. विश्वासघात, मतभेद, आर्थिक प्रश्न, मानसिक तणाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या इत्यादी. त्यातून कधीही परिस्थिती चिघळू शकते. भांडणाच्या वेळी किंवा तणावाखाली असताना संवाद करणे टाळलं तर पुढे संवाद टिकून राहतो. वैयक्तिक आयुष्यात पती-पत्नी दोघंही अनेकदा भांडतात. म्हणून प्रत्येक वेळेस वाद झाला, भांडणं झालं तरी बोलणं टाळायचं नाही. भांडणाच्या वेळी विषय वेगळं वळण घेऊन कायमचा संवाद संपवू शकतो. त्यामुळे जेव्हा कधी वातावरण निवळेल तेव्हा शांततेत संवाद केल्यास तो अधिक प्रभावी ठरतो. विश्वास हा नात्याचा गाभा आहे. विश्वासघात झाल्यास संवाद हा तो दुरुस्त करण्याचा मार्ग असतो. संवादाच्या माध्यमातून त्या अंतरावर विजय मिळविता येतो. नातेसंबंध टिकवण्यासाठी महागड्या भेटवस्तू, मोठ्या योजना किंवा अविश्रांत प्रयत्न करण्याची गरज नसते. गरज असते ती फक्त प्रामाणिक आणि खुले संभाषण करण्याची. त्यामुळे कितीही वादविवाद झाले तरी संवाद शक्य तितका जोडून ठेवायचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा संवाद योग्यरीत्या होतो, तेव्हा कोणताही वाद मिटू शकतो. नातं टिकू शकतं, फुलू शकतं आणि अधिक सशक्त बनू शकतं. त्यामुळे संवादाला पर्याय नाही. यासाठी बोलत राहा, हसत राहा आणि नातं जपत राहा.

**सुनील शिरपुरे**/७०५७१८५४७९

### श्रीलंकेची अजब दुनिया

श्रीलंका म्हणजे पूर्वीचे सिलोन. सुंदरता काय वर्णावी या जगाची. एखादा चांगला देश पाहण्याची संधी मिळणे हा एक मोठाच योग असतो. संधी चालून आली अन् श्रीलंकेची सफर झाली; तीही तेथे त्सुनामीसारखं भयंकर वादळ आले त्या दरम्यान. पाहायला सुरुवात केली तेव्हा तेथे वादळ नव्हतं; भरपूर पाऊस मात्र होता. अगदी बेटावरचा देश, पण हवामान मात्र सुसह्य व आल्हाददायक. तिन्ही बाजूंनी समुद्र वेढलेला तरीही निश्चिंत जीवन जगणारी माणसे. श्रीलंकेची लोकसंख्या अवघी दोन-सव्वादोन कोटी. स्वच्छता म्हणावी तर नंबर एकची. गॉल बीचवर गेलो. समुद्राच्या किनाऱ्यावर लॉन आणि रस्त्याच्या पलीकडे मोठ्या टोले जंग इमारती! मन मोहून जावं तसं काहीसं झालं; त्यात खूप मस्ती केली. छान गाणी म्हटली



व आनंदाने बेहोश होऊन नाचलो. डिसेंबरचा महिना असल्याने अगदी लेटेस्ट सुंदर पतंगी उडत होत्या. कँडी या गावी एलिफंट राईड केली. स्पाईस गार्डनमधील प्रत्येक शारीरिक दुखण्यावर मुळापासून बरी करणारी औषधे सामग्री घेतली. औषधाच्या बाबतीत आमच्या ग्रुपमधील ८४ वर्षांचे काका आदर्श ठरले. आतापर्यंतच्या वयात त्यांनी कुठल्याही गोळ्या-औषधं खाल्लेली नव्हती, हे ऐकून सान्यांनी तोंडात बोटे घातली. तेथील संस्कृतीचे आणि लोकनृत्याचे प्रतीक असलेले कल्चरल डान्सिंग शॉर्टस डोळे भरून बघितले. त्यातच शुद्ध भक्तीचे प्रतीक पंचमुखी अंजनेय टेम्पल आणि हनुमान मंदिर तसेच रामाने स्थापित केलेले दोन ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले. मन अतिशय प्रसन्न झाले. रावणाचा महाल खूपच उंचावर होता. त्याचे आता अवशेष नसल्याचे कळले. परंतु त्या पहाडावर चढण्याचा मार्ग बघितला आणि त्याचे विमान ठेवण्याचे हेलिपॅडसुद्धा बघितले. चहा फॅक्टरीमधून चहा घेण्याचा मोह आवरला नाही. बुद्धाच्या पाच केव्स बघितल्या. ध्यानस्थ मूर्ती आणि विष्णूसहित बुद्धाचे दर्शन घेतले. देशातील लोकांची सौंदर्य दृष्टी वाखाणण्यासारखी वाटली. त्याचबरोबर स्वच्छता, कुठेही काडी-कचऱ्याचा लवलेश नाही. विड्याच्या पानांच्या वेलीच वेली, परंतु पान खाऊन थुंकण्याची एकही पिचकारी दिसली नाही. निसर्ग अगदी भरभरून सुंदरता प्रदान करतो आहे, पण त्याची कदरही पदोपदी केल्याची जाणीव होते. रस्ते अत्यंत मनमोहक सुंदर कळ्या डांबरी रेषा जणू ओढलेल्या यावर पायी चालणाऱ्यांसाठी भरपूर जागा. जीवन सुरक्षित असल्याचा अनुभव. अजिबात प्रदूषण नाही. दृष्टी सुदृढ व सुंदर असली म्हणजे खऱ्या सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटता येतो, असेच येथे जाणवले.

**अचला तांबोळी**/९८९०६१७५३९

### आरसा... मानवी मनाचा

आरसा नसता तर माणसाचे काय झाले असते? माणसाने त्याचे तोंड कशात न्याहाळले असते? आपण सुंदर दिसतो की कसे? माणसाला कळलेच नसते. या सर्वांवर उपाय म्हणून मानवाने आरशाचा शोध लावला. प्रत्येकाला आपल्या व्यक्तिमत्त्वाचे खरे प्रतिबिंब दिसावे, समजावे, आकळता यावे यासाठी. आरसा कधीच कोणतीही गोष्ट लपवत नाही. जे काही समोर उभे असेल ते अगदी हुबेहूब तसेच दाखवतो. ते चांगले आहे की वाईट आहे, सुंदर आहे की कुरूप आहे, आकर्षक आहे की बेढब आहे, आवडते आहे की नावडते आहे, याचा कोणताही विचार आरसा करत नाही. जे आहे तसेच दाखवणे हेच त्याचे काम आहे; जे तो टाळू म्हटले तरीही टाळू शकत नाही. आरसा लहान असो की मोठा, आरशाच्या काचेचा एखादा छोटा तुकडा का असेना, त्यात जेवढे दिसते तेवढे तो सही सही दाखवतो. मिठाचा किंवा साखरेचा एखादा छोटा कण जसा आपली चव सोडत नाही तसेच आरसा आपला गुणधर्म सोडत नाही. व्यक्तिमत्त्व आकर्षक असणे हे चांगलेच आहे; त्याचबरोबर आपले मन स्वच्छ असणे, साफ असणे, निर्मळ असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. किंबहुना व्यक्तिमत्त्वापेक्षाही आपले मन स्वच्छ असणे जास्त महत्त्वाचे आहे. 'नाही निर्मळ जीवन काय करील साबण?' असे जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांनी सांगितलेच आहे. आरसा आपले व्यक्तित्व तर दाखवतो; पण आपले मन दाखवू शकत नाही. मानवी मनाचा अभ्यास करण्यासाठी अनेक विद्वानांनी प्रयत्न केले आहेत, संत-महात्म्यांनी त्यांचे विचार सांगितले; पण आजही मानवी मनाच्या बाबत आपण तितकेच अंधारात आहोत. म्हणून यावर एकच उपाय म्हणजे आपल्या मनाचा आरसा! हा आरसा कधीच भंगत नाही, त्याचा पारा कधीही उडत नाही आणि तोही कधीच खोटे दर्शन देत नाही. काचेच्या आरशात बघणे महत्त्वाचे आहेच; त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे आपल्या मनाच्या आरशात निरखून बघणे. आपण आपला चेहरा आरशात बघू तेव्हा आपल्याला आपल्याबद्दल लाज वाटायला नको, एवढी एकच गोष्ट प्रत्येकाने लक्षात ठेवली तर जगात सुख-समाधान-शांतता-विश्वास-प्रेम नांदायला वेळ लागणार नाही. चित्रपट गीतांमध्येही आरशाचे यथार्थ वर्णन आलेलेच आहे- 'तोरा मन दर्पन कहलायें, भले-बुरे सारे कर्मों को देखे और दिखाये...'

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### न पचणारे सत्य

हल्ली शनिवार, रविवार आला की बाहेर गर्दीत वाढ झालेली लक्षात येते. शनिवार संध्याकाळपासूनच रेस्टॉरंट्स, मॉल्स, स्ट्रीट फूड स्टॉलजवळ माणसांचे थवे उभे दिसतात. प्राईम टाईमला रेस्टॉरंटसमध्ये लोक आपला नंबर येण्याची वाट बघत असतात. त्यात सगळ्या वयोगटातले लोक असतात. हल्ली सगळ्यांना एका ठिकाणी भेटण्याची सोय होते म्हणून हा एक उत्तम उपाय दिसून येतो. कुणाच्या घरी भेटायचे म्हणजे जागेचा प्रश्न पडतो आणि यजमानांना अतिरिक्त कामाचा भार पडतो. म्हणून हा पर्याय निवडला जातो आणि यात वावगे काही नाही. परंतु विषय त्या पलीकडचा आहे. कुठल्याही बऱ्यापैकी हॉटेलमध्ये गेल्यावर तिथल्या किमती पण बऱ्यापैकी महाग असतात. साधी पाणीपुरी देखील ६०-७० रुपयांची असते. कॅफेत गेल्यावर दोघांचे हजार रुपयांचे सहज बिल येते. त्यात असे दिसून येते की बरेच लोक कुठेही बाहेर खाण्यासाठी गेले असता अन्न टाकून निघून जातात. ते बघून जीव हळहळतो.

मध्ये एका ठिकाणी जाण्याचा योग आला. तेव्हा आमच्या आधीच्या लोकांनी छोले भटुरे, डोसा, सिझलर असे बरेच प्रकार मागवले होते. कितीतरी लोकांनी त्यातले अर्धे अन्न तसेच टाकून दिले होते. बरे, हे आपल्यासारखेच मध्यमवर्गीय होते जे म्हणजे आपणही कांदा, कोथिंबिरीचे भाव गगनाला भिडले, कंबर मोडली अशा बोंबा ठोकतात.

एका ओळखीच्या मेसच्या बाई तक्रार करत होत्या विद्यार्थ्यांना डबा देते तर आठवड्यातून तीन वेळा डबा जसाच्या तसा परत येतो आणि कचऱ्याच्या टोपलीत जातो. मोठमोठ्या कॉफी शॉपमध्ये पाचशे ते सातशे रुपयांची कॉफी अर्धवट टाकून लोक निघून जातात. पाचशे रुपयातले तीनशे रुपये आपण कचऱ्यात टाकले हे त्यांच्या गावीही नसते. काही लोकांची मानसिकता अन्न टाकण्याची असते असे बघण्यात येते. काही वेळा ७-८ लोकांसाठी किती अन्न मागवावे याचा अंदाज न आल्याने आठ प्रकारचे अन्न मागवले जाते आणि अर्धे टाकून दिले जाते. तरी बरं आता घरी पार्सल घेऊन जाण्याची सोय आहे. याचा फायदा ज्यांना अन्नाची किंमत आहे ते घेतात. बाकी लोक बिल चुकते करून निघून जातात. या गोष्टीला आळा घालण्यासाठी आता हॉटेलवालेच विविध युक्त्या करतात, पाट्या लावतात ही दिलासादायक गोष्ट आहे.

तीच बाब कपड्यांसाठीही लागू पडते. गंमत म्हणून, सहज दिसले म्हणून, तेव्हा आवडले म्हणून, करमत नव्हते म्हणून शॉपिंग करावसं वाटलं आणि भरमसाट कपडे घेतले जातात. पुढे कधीही न घातलेला कपडा त्याच्या लेबलसकट तसाच पडून राहतो आणि टाकून दिला जातो. इथे त्याचा रियुज होऊ शकतो हा फरक आहे. परंतु प्रश्न वृत्तीचा आहे. जवळच्या नातेवाईकाचे लग्न असले की दर दिवशी वेगळे कपडे हवेतच. त्यावर साजेसे दागिने हवेतच. स्वतः नवरा-नवरी देखील आयुष्यात दुसऱ्यांदा ते कपडे घालू पाहत नाहीत. गरिबी, महागाई नेमकी कोणती? असा प्रश्न स्वाभाविकपणे पडतो. लोकांजवळ खूप पैसा आहे की खूप पर्याय उपलब्ध आहेत? स्वातंत्र्य वाढलंय की कशाची किंमत राहिली नाही? मुलांचे अवास्तव लाड पुरविताना अनाठायी खर्च आणि लाड यावर बंधन लादण्याची जबाबदारी आपलीच आहे. पैशाची, वेळेची आणि राष्ट्रीयय संपत्तीची नासाडी न करणे आणि न करू देणे हे तर आपल्या हातात आहेच ना.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### सजग ग्राहक : बाजारपेठेची खरी ताकद!

जागतिक ग्राहक दिन दरवर्षी १५ मार्च रोजी साजरा केला जातो. एक ग्राहक म्हणून आपले हक्क काय आहेत याविषयी जागरूकता निर्माण व्हावी याकरिता हा दिवस साजरा केला जातो. बरेचदा खरेदी करताना नवनवीन मार्केटिंग फंडात अडकून ग्राहकांची फसवणूक होते. कधी सुपरमार्केटमधील आकर्षक ऑफर्सना अनवधानाने बळी पडून नकळतपणे अनावश्यक खर्च होऊन जातो. बाजारपेठेचा केंद्रबिंदू म्हणजे ग्राहक! आणि हा केंद्रबिंदूच बाजारपेठेत अनेक वेळा फसवणुकीला बळी पडतो, असे चित्र बघायला मिळते. आकर्षक जाहिराती, मोठ्या सवलतींचे आमिष, 'एकावर एक फ्री' अशा ऑफर्स पाहून अनेक जण विचार न करता खरेदी करतात. त्या क्षणी ती खरेदी फायदेशीर वाटते; पण नंतर लक्षात येते की अनेक वस्तू गरजेच्या नव्हत्याच.

कधी वस्तूची गुणवत्ता निकृष्ट असते, कधी मुदत संपण्याच्या जवळ आलेल्या वस्तू विकल्या जातात, तर कधी बिल न देता ग्राहकांची फसवणूक केली जाते. अशा वेळी ग्राहकाने सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. वस्तू घेताना तिची किंमत, उत्पादनाची तारीख, मुदत, गुणवत्ता आणि बिल घेणे या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

ग्राहकांनी खरेदी संदर्भातील आपले हक्क जसे की, सुरक्षेचा हक्क, माहिती मिळण्याचा हक्क, योग्य किमतीत वस्तू मिळण्याचा हक्क आणि तक्रार नोंदवण्याचा हक्क याविषयी जागरूक राहणे आवश्यक आहे. जागतिक ग्राहक दिन आपल्याला याच गोष्टींची आठवण करून देतो. सजग आणि जागरूक ग्राहक हा बाजारपेठेचा केंद्रबिंदू असून बाजारपेठेची ताकद आहे याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. याकरिता प्रत्येकाने जागरूक ग्राहक बनून स्वतःचे आणि समाजाचे हित जपावे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### दुसऱ्यांचे दुःख दूर करणाऱ्यांचे दुःखही दूर होते

''दूसरों का दुःखड़ा दूर करने वाले, तेरा दुःख दूर करेंगे राम'' या ओळीमध्ये भारतीय संस्कृतीचा अत्यंत सुंदर संदेश दडलेला आहे. दुसऱ्यांच्या संकटात धावून जाणारा समाज स्वतःच्या संकटावरही नक्की मात करतो. आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीकडे पाहताना ही भावना अधिक अर्थपूर्ण वाटते. कोरोना महामारीच्या काळात जगातील अनेक देश स्वतःच्या अडचणींमध्ये गुंतले होते. परंतु भारताने त्या काळात केवळ स्वतःपुरता विचार न करता इतर देशांनाही मदतीचा हात दिला. औषधे, लसी आणि आवश्यक वैद्यकीय साहित्य अनेक देशांना पाठविण्यात आले. ही केवळ राजनैतिक कृती नव्हती; ती भारतीय संस्कृतीतील 'वसुधैव कुटुंबकम्'' या मूल्याची प्रत्यक्ष अभिव्यक्ती होती. या मदतीचा एक मोठा सकारात्मक परिणामही पुढे दिसून आला. युद्धजन्य परिस्थितीतही जगभरात अडकलेल्या भारतीय नागरिकांना परत आणण्याच्या मोहिमेत अनेक देशांनी भारताला सहकार्य केले. कारण वेळोवेळी भारताने दाखवलेली संवेदनशीलता जगाने अनुभवलेली आहे. त्यामुळे परदेशात अडकलेल्या हजारो भारतीयांना स्वदेशी परत येण्याचा मार्ग तुलनेने सुलभ झाला.

कोणत्याही मोठ्या परिवर्तनाच्या काळात काही अडचणी निर्माण होतात. कधी कधी तुटवड्याची भावना निर्माण होते, राजकीय क्षेत्रात तर या मुद्द्यांवर आरोप-प्रत्यारोपही होतात. विरोधी पक्ष आपली भूमिका मांडतात आणि कधी कधी त्यातून राजकीय फायदा घेण्याचाही प्रयत्न होतो. परंतु व्यापक दृष्टिकोनातून पाहिले, तर भारताने अनेक मोठ्या संकटांना धैर्याने सामोरे जाऊन त्यातून मार्ग काढला आहे. महामारीसारख्या जागतिक संकटातही देशाने संयम, सहकार्य आणि सकारात्मक दृष्टिकोन दाखवला. म्हणूनच आज जगात सुरू असलेली युद्धजन्य परिस्थिती आणि त्यामुळेच निर्माण झालेल्या अडचणी, यांचा कायमस्वरूपी निराशेचा अर्थ लावण्याची गरज नाही.

**श्रीकांत तिजारे**/९४२३३८३९६६

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए –३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी –८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# माता- पालक समुपदेशन मेळाव्याचे आयोजन




तभा. वृत्तसेवा

**बीड |** शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ या वर्षातील माता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम पंडित दीनदयाल उपाध्याय व भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. त्यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या सचिव मा. डॉ.सौ. सीमाताई जोशी, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड.मा.सौ. अर्चना ताई तुंगार, मा.श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी, मा. डॉ.सौ.मधुराताई कुलकर्णी, प्रभारी मुख्याध्यापिका सौ.अर्चनाताई मोराळे, पालक प्रतिनिधी म्हणून पशुवैद्यकीय अधिकारी सौ. अंजलीताई मोहोळकर आदी उपस्थित होते. गीत क्रांती ताई पोरवाल यांनी गायले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरतीताई जोशी यांनी केले. सर्व महिलांना मार्गदर्शन मधुराताई यांनी केले. ताईनी सांगितले की, आपली संस्कृती स्त्रीच्या वर्तनावर जोखली जाते. विद्यार्थी विकासाचे टप्पे, सर्वांगीण विकास, आईची भूमिका, मुलांच्या सवयी यांबद्दल समुपदेशन केले. एक एप्रिल पासून पहिली चा वर्ग सुरू करण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे हे सांगितले.

माता पालकांनी काही चांगल्या गोष्टी तसेच त्यांना वाटणाऱ्या त्रुटी व्यवस्थित रित्या मांडल्या. माता पालक गायकवाड ताई शाळेतील संस्कारांमुळे शाळेची ओळख माता पालकांनी विशेष मांडले. चाळीस महिलांची उपस्थिती होती.

पालक प्रतिनिधी म्हणून अंजली ताईंनी इंग्रजी माध्यमापेक्षा मराठी माध्यम कसे श्रेष्ठ आहे ते सांगितले. त्याचबरोबर शाळेचे कौतुक केले. गीता जयंती निमित्त ध्रुव गट, पहिली व दुसरी या विद्यार्थ्यांनी भगवतगीता बाराव्या अध्यायाचे पठण केले होते.

# खिलाडू वृत्तीने चांगला समाज व निकोप राष्ट्रनिर्मिती होते : राजकिशोर मोदी

## अंबाजोगाईत 2027 मध्ये भव्य आयपीएल फॅन पार्क उभारण्याचा मानस ; अक्षय मुंदडा

### खेळामुळे सांघिक भावना टिकून राहते : पोलीस निरीक्षक शरद जोगदंड | निरोगी शरीर हे निरोगी मनाचे प्रतीक : डॉ राजेश इंगोले

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** स्व.प्रकाशचंद मुथा यांच्या स्मरणार्थ अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा अंबाजोगाई शहरातील क्रीडाप्रेमी, खेळाडू, पालक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाच्या निमित्ताने क्रीडा संस्कृतीचा प्रसार आणि नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा संदेशही देण्यात आला. कार्यक्रमात बोलताना प्रमुख पाहुणे राजकिशोर मोदी यांनी खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञान युगात मुलांना मैदानावर खेळण्यासाठी प्रवृत्त करणे ही काळाची गरज बनली आहे. अंबाजोगाई शहरातील मुलांना मैदानावर आणून त्यांना योग्य प्रशिक्षण देण्याचे आणि राज्यस्तरावर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मोहित परमार आणि त्यांच्या सहकारी माही परमार करत आहेत. त्यांच्या अथक परिश्रमामुळे अनेक लहान खेळाडूंना मोठ्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळत आहे. ते पुढे म्हणाले की, खेळ हा केवळ मनोरंजनाचा भाग नसून तो जीवनाचा अविभाज्य घटक आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरूस्ती वाढते, मानसिक बळ मिळते आणि जीवनातील यश-अपयश स्वीकारण्याची क्षमता निर्माण होते. क्रिकेट हा खेळ आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय असून भारतीय खेळाडूंनी जगभरात आपल्या देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. अंबाजोगाई सारख्या शहरातूनही भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. तुम्हाला चांगला नागरिक आणि चांगला माणूस व्हायचे असेल तर आधी चांगला खेळाडू होणे गरजेचे आहे, असे सांगत त्यांनी उपस्थित लहान खेळाडूंना प्रेरणा दिली. त्यांनी स्व.प्रकाशचंद मूथा यांच्या कार्याची आठवण करून देताना सांगितले की, अंबाजोगाई शहरात विविध खेळांसाठी साहित्य सहज उपलब्ध व्हावे यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. शहरातील क्रीडा संस्कृती जपण्यासाठी आणि मुलांना खेळाकडे वळवण्यासाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात बोलताना अक्षय मुंदडा यांनी अंबाजोगाई शहरासाठी एक महत्त्वाची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, येत्या काळात अंबाजोगाई मध्ये आयपीएल फॅन पार्क आयोजित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

२०२७ मध्ये अंबाजोगाई शहरात जवळपास वीस हजार प्रेक्षक एकत्र येऊन मोठ्या स्क्रीनवर आयपीएल सामने पाहू शकतील असे भव्य फॅन पार्क आयोजित करण्याचा मानस आहे. यामुळे शहरातील क्रिकेटप्रेमींना आयपीएलचा थरार एकत्रितपणे अनुभवता येईल, असे त्यांनी सांगितले. यामुळे अंबाजोगाई शहराच्या क्रीडा संस्कृतीला नवे बळ मिळेल तसेच क्रिकेटप्रेमींना मोठ्या प्रमाणावर आनंद घेण्याची संधी मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. तसेच शहरातील तरूण खेळाडूंनी मेहनत, चिकाटी आणि शिस्त यांचा अवलंब करून आपल्या क्रीडा कारकिर्दीत यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी खेळाचे सामाजिक महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले की, खेळ ही अशी गोष्ट आहे जी समाजात सांघिक भावना टिकवून ठेवते आणि लोकांना एकत्र आणण्याचे काम करते. कोणताही खेळ असो, त्यामधून एकमेकांशी सहकार्य करण्याची वृत्ती निर्माण होते आणि टीमवर्कची भावना विकसित होते. आजच्या काळात मुले मोबाईल गेम्समध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतलेली दिसतात, त्यामुळे मैदानावर खेळणाऱ्यांची संख्या कमी होत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्यामुळे मुलांना मैदानावर येऊन खेळण्याची प्रेरणा मिळते आणि त्यांच्या प्रतिभेला योग्य व्यासपीठ उपलब्ध होते. ते पुढे म्हणाले की, अशाच छोट्या अकॅडमीमधून भविष्यात मोठे खेळाडू तयार होतात. रणजी ट्रॉफी, आयपीएल तसेच अंडर-१४, अंडर-१९ आणि भारतीय संघात खेळणारे अनेक खेळाडू अशाच पायाभूत स्तरावरून पुढे आले आहेत. त्यामुळे पालकांनीही आपल्या मुलांना खेळासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. विजेत्या संघाचे अभिनंदन करताना त्यांनी पराभूत संघांनी निराश न होता पुढील स्पर्धांमध्ये अधिक मेहनत घेऊन यश संपादन करण्याचा सल्ला दिला...

# श्री क्षेत्र रामतीर्थ येथे राम विजय ग्रंथ पारायण आयोजन

तभा. वृत्तसेवा

**बीड , प्रतिनिधी |** श्रीक्षेत्र रामतीर्थ दादा महाराज खडकी कर रामतीर्थ येथे रामनवमीनिमित्त, राम विजय ग्रंथाचे पारायण आयोजित केले आहे, सकाळी सात ते दहा संध्याकाळी सात ते आठ या वेळेमध्ये राम विजय ग्रंथ पारायण वाचन श्री विद्या गुरु महाराज मी स्वत: करणार आहे, गुढीपाडवा च्या शुभमुहूर्तावर सकाळी प्रभू रामचंद्र यांच्या मूर्ती अभिषेक व श्री ,च्या समाधीस अभिषेक होईल , संध्याकाळी हरिपाठ, राम नाम जप सव्वा लक्ष करण्यात येणार आहे, रोज हार फुले प्रसाद यजमान श्री अनिल शेठ चरखा, रामनवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता राम जन्म होईल, प्रभू रामचंद्र च्या मूर्तीचा अभिषेक व आरती होईल, प्रसाद वाटप होईल संध्याकाळी सुंदर कांड होईल, दुसऱ्या दिवशी सकाळी



दहा ते एक या वेळेमध्ये दादा महाराज यांच्या समाधीत व प्रभू रामचंद्र यांच्या मूर्ती व अभिषेक व आरती व ग्रंथ पूजन होईल एक वाजता भोजन प्रसाद होईल, यजमान श्रीअनिल शेठ, आनंद ,अजय , गणेश चरखा परिवार , यांच्या हस्ते पूजा होईल, तरी सर्व भाविक भक्तांनी कार्यक्रमाचा व प्रसादाचा लाभ घेणे, असे आव्हान श्री विद्या गुरु महाराज खडकीकर रामतीर्थ मठ यांनी केले आहे ,

# अल्पवयीन मुलीला घरात बोलावून हातपाय बांधून पाशवी बलात्कार

तभा. वृत्तसेवा

**परळी |** घरात बोलावून घेत तोंडात बोळा कोंबून अल्पवयीन मुलीवर दोन नराधमांनी अत्याचार केल्याची खळबळ जनक घटना तालुक्यातील धारावती तांडा येथे घडली.

पीडित मुलगी १६ वर्षांची अल्पवयीन असून दोन जणांनी तिला गोड बोलून आपल्या घरी बोलावले.मुलगी घरात जाताच आरोपींनी घराचा दरवाजा आतून बंद केला. त्यानंतर एका नराधमाने पीडितेचे हात-पाय घट्ट बांधले व ती ओरडू नये म्हणून तिच्या तोंडात कापडाचा बोळा कोंबला. यानंतर दोन्ही नराधमांनी तिच्यावर क्रूरपणे लैंगिक अत्याचार केला.

अत्याचारानंतर पीडितेची सुटका करताना नराधमांनी तिला जीवे मारण्याची धमकी दिली. हा प्रकार कोणाला सांगितल्यास तुला संपवून टाकू, असे म्हणत तिला दहशतीखाली ठेवले. धमकीमुळे प्रचंड घाबरलेल्या मुलीने कशीबशी आपली सुटका करून घर गाठले आणि घडलेला सर्व संतापजनक प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. पालकांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ परळी ग्रामीण पोलीस ठाणे गाठत फिर्याद दिली.

पोलिसांनी या घटनेची दखल घेत आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४, १२७(२), ३५१(२), ३५२, ३(५) आणि बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) २०१२ च्या कलम ४ आणि १७ नुसार गुन्हा रजिस्टर नंबर १२५/२०२६ दाखल केला आहे. सध्या दोन्ही आरोपी फरार झाले होते. परंतु प्रकरणाचा सखोल तपास अंबाजोगाई उपविभागाचे पिंक पथक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव करीत आहे.

# सांची बुद्ध विहारात बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचे उदघाटन



तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी**

| भारतीय बौद्ध महासभा माजलगाव तालुक्याच्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापूरी कॅम्प येथे दि २१ मार्च रोजी होत आसलेल्या भव्य धम्म मेळाव्याच्या अनुशंगान बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचे तसेच बाभळगाव व कल्याणनगर या ठीकाणी महिला उपासिका शिबीराचे आयोजन करण्यात आले त्या श्रामणेर शिबीराचे उदघाटन दि १३मार्च रोजी करण्यात आले त्या शिबीरासाठी संघनायक म्हणुन पुज्य भन्ते डॉ बी सारीपुत्त महाथेरो यांनी शिबीरार्थी ना श्रामणेर दिक्षा दिली या शिबीरासाठी केंद्रिय शिक्षक म्हणुन डॉ युवराज मोरे नांदेड हे आहेत या शिबीराचे उदघाटन भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व चे अध्यक्ष आद.ॲड. बी बी धन्वे यानी केले तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे बीड पुर्व च्या महिला अध्यक्षा कमलताई डोंगरे,सरचिटणीस आद.डॉ संतोष बोबडे ,संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,आशाताई मोरे,हे उपस्तीत होते

# सावरगाव येथे नाथ संजीवन समाधी महोत्सवानिमित्त कार्यक्रम

**बीड |**आष्टी तालुक्यातील सावरगावयेथील क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान येथे नाथ संजीवन समाधी महोत्सवास प्रारंभ होत असून, हा महोत्सव १९ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहे. १६ मार्च पैठण येथे निशाण मिरवणूक होईल. १८ मार्च सकाळी ११ वाजता गडावर 'कावडींचे' आगमन होणार असून, दुपारी १२ वाजता महाआरती होईल. दुपारी १:३० ते दुपारी ४ पैठण, काशी आणि इतर तीर्थक्षेत्रांहून आणलेल्या पवित्र गंगाजलाने समाधीस जलाभिषेक केला जाईल.

देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी नियमावली करण्यात आली असून, मंदिर परिसरात रांगेत शिस्त पाळावी, प्लास्टिक कॅन किंवा बाटल्यांमधून पाणी आणू नये. मंदिर परिसरात स्वच्छता राखावी. १९ मार्च पहाटे ५:३० वाजता मच्छिंद्रनाथ यांच्या समाधीची विधीवत महापूजा आणि सकाळी ६ वाजता महाआरती होऊन भाविकांना दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. मच्छिंद्रनाथ गडावरील मुख्य मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम प्रगतिपथावर असून, भाविकांनी यासाठी सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष, सचिव आणि ग्रामस्थ सावरगाव व शेंडेवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गजानन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे विभागीय आयुक्तांनी केले कौतुक

तभा. वृत्तसेवा

**नवगण राजुरी दि.१५ (प्रतिनिधी)** | छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर महसूल मंडळ नवगण राजुरी अंतर्गत तळेगाव येथे संपन्न झाले. या कार्यक्रमात गजानन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषेत लेझील पथकाच्या माध्यमातून देशभक्तीचे प्रदर्शन सादर करून सहभाग घेतल्याबद्दल विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.




बीड तालुक्यातील महसूल मंडळ नवगण राजुरी अंतर्गत मौजे तळेगाव येथे छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आदिंच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी गजानन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपारीक वेशभूषेत लेझीम पथकाच्या माध्यमातून देशभक्तीचे प्रदर्शन करून सहभाग नोंदवला. याचे प्रमुख पाहूण्यांनी कौतुक करून गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत पौळ यांच्या कार्याची प्रशंसा करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, तालुका शिक्षणाधिकारी समंदर खान यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शाळेला प्रवृत्त केले. यावेळी सव महसूल मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व तहसील कार्यालय बीडचे कर्मचारी उपस्थित होते.

# झोपलेल्या अल्पवयीन विवाहितेला उचलून नेले, अत्याचार केला चावडीच्या खांबाला बांधून आरोपी पळाला

**बीड |** घरामध्ये झोपलेल्या अल्पवयीन विवाहितेला उचलून गावाबाहेर नेले.तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्यानंतर तिला गावामध्ये आणले व गावच्या चावडीवर खांबाला बांधून ठेवल्याचा प्रकार सकाळी समोर आल्यानंतर गावकऱ्यांनी या विवाहितेची सुटका केली. या घटनेने खळबळ माजली आहे.

पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील एका गावात घडलेल्या घटनेने कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अल्पवयीन विवाहिता अकरा मार्च रोजी आपल्या घरात झोपलेली होती. यावेळी वैभव पटेकर याने तिला उचलून नेले. नदी कडील भागात नेऊन तिच्यावर बलात्कार केला. घरातून उचलून घेऊन जात असताना तिने विरोध देखील केला मात्र तिचं तोंड दाबून धरण्यात आल्यामुळे प्रतिकार कमी पडला गेला. तिच्यावर अत्याचार केल्यानंतर तिला गावात आणून चावडीवरील खांबाला बांधून टाकले. ही घटना सकाळी ग्रामस्थांनी पीडीतेला खांबाला बांधल्याचं पाहिल्यानंतर घटना उघडकीस आली. गावचे सरपंच व पिडीतेच्या कुटुंबातील सदस्य चावडीवर आल्यानंतरच तिला सोडवण्यात आले.



दरम्यान या घटनेने विवाहिता प्रचंड घाबरलेली होती, त्यामुळे तिने पोलीसात तक्रार दिली नाही. त्यानंतर, आज कुटुंबीयांना ही घटना संपूर्ण घटना सांगितल्यानंतर पीडित अल्पवयीन विवाहितेने पोलिसांत फिर्याद दिली. त्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली असून न्यायालयाने आरोपीला 17 मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलिसांसह पिंक पथकाकडून तपास केला जातोय. परंतु या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पीडिता ही अल्पवयीन असल्याने आरोपीवर पोक्सो कायद्यांतर्गत कारवाई केली जाणार असल्याची माहिती आहे.

# काँग्रेसकडून संसदीय नियमांची आणि अध्यक्षांच्या आदेशांची अवहेलना..!

## बीड भाजपाचे राहुल गांधी विरोधात जोडे मारो आंदोलन..

तभा. वृत्तसेवा

**बीड प्रतिनिधी |**

१२ मार्च २०२६ रोजी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्पीय बजेट चालू असताना मकर प्रवेशद्वारच्या बाहेर काँग्रेस नेते खा. राहुल गांधी व काँग्रेस तसेच अन्य विरोधी पक्षातील जवळपास २० खासदारांनी चहा-बिस्कीट बरोबर 'चायपार्टी' आयोजित करणे ही अत्यंत खेदजनक व आक्षेपार्ह बाब आहे. संसद ही आपल्या देशाची सर्वोच्च लोकतंत्र संस्था आहे, त्याची प्रतिष्ठा व मर्यादा राखणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. परंतु या घटनेच्या माध्यमातून संसद परिसरात एकप्रकारे 'पार्लमेंट पिकनिक स्पॉट' बनविण्याचे विरोधकांकडून प्रयत्न करण्यात आले. विशेष म्हणजे मकर प्रवेशद्वाराजवळ कुठलेही धरणे-प्रदर्शन करू नये असे लोकसभा अध्यक्षांचे स्पष्ट निर्देश असतांनाही विरोधी पक्षाच्या खासदारांनी प्रवेशद्वारासमोर बसून विरोध करण्याचे नाटक केले, जे संसदीय नियमांची आणि अध्यक्षांच्या आदेशांची अवहेलना करणारे आहे.



यावेळी देशात घरगुती गॅसची कथित टंचाई असल्याचा भ्रम सर्वत्र पसरविण्याचे कटकारस्थान काँग्रेसने केले. आपले पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार देशाच्या प्रत्येक नागरिकाला ऊर्जा सुविधा पुरविण्याकरिता वचनबध्द होऊन सातत्याने काम करीत आहे.

काँग्रेस पक्षाचे हे कृत्य अशोभनीय, संसदीय नियमांची आणि अध्यक्षांच्या आदेशांची अवहेलना करणारे आहे.

प्रदेश सूचनेनुसार तथा राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने प्रदेश सरचिटणीस श्री. सुनीलजी राणे, आमदार संजयजी कणेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख, भाजपा नेते योगेश भैय्या क्षीरसागर जि.प.बांधकाम सभापती युधाजीत पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत आज भाजपा कार्यालय बीड येथे राहुल गंधी व काँग्रेस विरोधात जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

# गॅस-इंधन टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका : विनायक रत्नपारखी

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी |**

आखाती भागातील युद्धपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर गॅस, पेट्रोल व डिझेल टंचाईबाबत विविध अफवा पसरवल्या जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र अशा अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन भाजपाचे माजलगाव शहर मंडळ तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

दरम्यान जिल्हा प्रशासनाकडूनही अधिकृत पत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून Beed जिल्ह्यात कोठेही गॅस, पेट्रोल किंवा डिझेलची टंचाई नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅस तसेच पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.सोशल मीडियावरील काही पोस्टमुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत



असला तरी प्रत्यक्षात गॅस बुकिंग आणि वितरण प्रक्रिया नियमित सुरू आहे. काही ठिकाणी तांत्रिक कारणांमुळे किरकोळ विलंब होऊ शकतो; मात्र त्यामुळे टंचाई निर्माण झाल्याचे समजणे चुकीचे असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

यासंदर्भात विनायक रत्नपारखी म्हणाले की, जिल्हा प्रशासनाने अधिकृत पत्रकाद्वारे परिस्थिती स्पष्ट केली असून नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे. कोणत्याही अप्रमाणित माहितीवर किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये. विनाकारण जास्तीचे गॅस सिलेंडर खरेदी करणे किंवा इंधनाचा साठा करणे टाळावे, असेही त्यांनी सांगितले. तसेच काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने गॅस सिलेंडर साठवणूक केल्याची माहिती मिळाल्यास पुरवठा विभागाकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांपासून दूर राहून संयम बाळगावा, असे आवाहन विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## येरमाळा शिवारात गोवंशीय मांस जप्त

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१५ मार्च -**

येथील दुधाळवाडी पाटीजवळ गोवंशीय जनावराची अवैध कत्तल केल्याप्रकरणी येरमाळा पोलिसांनी एका तरुणावर गुन्हा दाखल करून मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुलतान अलिशेर कुरेशी (वय २४, रा. गराडा गल्ली, भूम ता. भूम जि. धाराशिव) याने १४ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे १०.२५ वाजता दुधाळवाडी पाटीजवळ मोबीन अजिज मुलानी यांच्या घराजवळ, येरमाळा शिवारात गोवंशीय जनावराची अवैध कत्तल केल्याचे आढळून आले.

या ठिकाणाहून सुमारे २० किलो मांस, लोखंडी तराजू तसेच मारुती सुझुकी (क्र. एमएच ४६ एडी १८९२) असा एकूण २ लाख १ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांना मिळून आला.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध पशु संरक्षण अधिनियम कलम ५(क), ५(ड) व ९ अन्वये येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.



# माजी मंत्री तानाजीराव सावंत सर्व सामान्य कार्यकर्त्यांना संधी देणारे नेते; विकी चव्हाण

**तेरखेड्यासह वाशी तालुक्यात प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा...**

**सुधीर घोलप**
**वाशी, दि.१५ मार्च -**

शिवसेना हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देणारा आणि त्यांना नेतृत्वाच्या पातळीवर नेणारा पक्ष म्हणून ओळखला जातो. या परंपरेनुसार माजी आरोग्यमंत्री तथा वाशी-भूम-परांडा मतदारसंघाचे आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या कार्यकर्त्यांना बळ देत त्यांना नेतृत्वात पुढे आणले आहे.



शिवसेनाप्रमुख कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या काळापासून सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्याची परंपरा कायम आहे. अनेक सामान्य कार्यकर्ते आमदार, मंत्री पदापर्यंत पोहोचले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा रिक्षाचालक ते मुख्यमंत्री असा प्रवासही त्याचे मोठे उदाहरण मानले जाते.

याच विचारातून आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी धाराशिव जिल्ह्यातील छोट्या-मोठ्या निवडणुकांमध्येही कार्यकर्त्यांना संधी देण्याची परंपरा जपली आहे. सर्वसामान्यांच्या कामासाठी निस्वार्थपणे धावणाऱ्या, पक्षाशी एकनिष्ठ राहणाऱ्या कार्यकर्त्यांनाच ते पुढे आणतात.

याचे उदाहरण म्हणजे संदेश उर्फ विकी चव्हाण. त्यांनी यापूर्वी ग्रामपंचायत निवडणूकही लढवली नव्हती. मात्र नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तेरखेडा जिल्हा परिषद गटातून त्यांना संधी देण्यात आली आणि ते विजयी झाले. पुढे धाराशिव जिल्हा परिषदेत सत्तास्थापनेदरम्यान त्यांची शिवसेनेच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली.

मी एक सर्वसामान्य कार्यकर्ता असून कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना मला मिळालेली ही संधी म्हणजे आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांचा माझ्यावर असलेला विश्वास आहे. हा विश्वास कायम ठेवत सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी काम करणार, असे मत नवनियुक्त जिल्हा परिषद सदस्य संदेश उर्फ विकी चव्हाण यांनी दै. तरूण भारतशी बोलताना व्यक्त केले. तसेच आ. सावंत यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त त्यांना शुभेच्छा देत पक्षाच्या ध्येय-धोरणांप्रती निष्ठा कायम ठेवण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

## तुळजापूरमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीत ७९४ प्रकरणे सामोपचाराने निकाली



### २२.८६ लाखांची वसुली

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ मार्च -**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण उस्मानाबाद यांच्या निर्देशानुसार १४ मार्च रोजी तुळजापूर येथील नूतन न्यायालयीन इमारतीत राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले.

लोकअदालतीचे उद्घाटन दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) तथा तालुका विधी सेवा समिती तुळजापूरच्या अध्यक्षा एस.डी. अवसेकर यांच्या हस्ते तुळजाभवानी मंदिरातील देवीचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अविनाश ढोके, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अनुपम मुक्कनवार तसेच तुळजापूर विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. जयवंत इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास तुळजापूर येथील विधिज्ञ, न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार उपस्थित होते.

लोकअदालतीमध्ये तुळजापूर तालुक्यातील प्रलंबित दिवाणी व फौजदारी स्वरूपाची ८५३ प्रकरणे तसेच दावा पूर्व ३,२७० अशी एकूण ४,१२३ प्रकरणे सामोपचाराने मिटविण्यासाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी प्रलंबित ५८ आणि वादपूर्व ७३६ अशी एकूण ७९४ प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यात यश आले.

या लोकअदालतीत प्रलंबित बँक प्रकरणे व दावा पूर्व प्रकरणांमधून सुमारे २२ लाख ८६ हजार रुपयांची वसुली संबंधित नगरपरिषद, बँका व ग्रामपंचायतींना झाली. फौजदारी प्रकरणांमध्ये आरोपींना दंडात्मक शिक्षा देऊन १४ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. तसेच धनादेश अनादर (कलम १३८) प्रकरणांत तडजोड होऊन ९ लाख रुपये फिर्यादी पक्षाला मिळाले.

लोकअदालतीत अल्पोपहाराचे नियोजन ॲड. संजय हुनसिंगराव पवार यांनी केले. या उपक्रमास पक्षकार, विधिज्ञ, बँक कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तुळजापूर न्यायालयातील सर्व न्यायिक अधिकारी, कर्मचारी तसेच तुळजापूर विधिज्ञ संघाच्या सदस्यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## महात्मा फुले जयंतीच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त समिती स्थापन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

सामाजिक क्रांतीचे जनक क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त ११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२७ या कालावधीत वर्षभर विविध शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीच्या उपाध्यक्षपदी रविकांत गोरे, स्वागताध्यक्ष दत्ता गोरे माळी, कोषाध्यक्ष सौदागर गोरे माळी, सचिव अमर माळी, कार्याध्यक्ष बळीराम माळी तर मिरवणूक प्रमुख म्हणून स्वराज जानराव, प्रवीण वाघमारे व सचिन दिलपाक यांची निवड करण्यात आली. तसेच मार्गदर्शक महादेव माळी, संजय माळी, गोविंद गोरे, राजाभाऊ माळी, चंद्रशेखर सुरवसे, चंद्रकांत गोरे यांचा समावेश करण्यात आला आहे.

## तेरणा अभियांत्रिकीत महिला सुरक्षा कायद्यांवर कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात महिलांच्या सुरक्षेसंदर्भातील कायदे व जनजागृती विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत 'जेंडर सेन्सिटायझेशन', 'पॉश ॲक्ट' आणि 'वुमन्स एम्पॉवरमेंट' या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

नाशिक येथील पॉश ट्रेनर ऋता पंडित यांनी जेंडर सेन्सिटायझेशन, महिला सुरक्षा कायदे तसेच महिलांसाठी उपलब्ध विविध सहाय्य प्रणालींबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या संसाधन अधिकारी अनुराधा देशपांडे यांनीही महिलांच्या अधिकार व सुरक्षिततेविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, विशाखा समितीच्या अध्यक्षा प्रा. सुनीता गुंजाळ, विभागप्रमुख डॉ. उषा वडणे यांच्यासह महिला कर्मचारी उपस्थित होत्या. यावेळी शिक्षण, संशोधन, प्रशिक्षण व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ५० हून अधिक विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.

जलतरण व कुस्ती स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या श्रावणी रणखांब आणि मोहिनी मेहर यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनीता गुंजाळ-कवडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. राजश्री यादव यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. राजश्री यादव, सविता नलावडे, सूक्ष्मा टेकळे व इंदुबाई कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कळंब येथे गावठी दारू जप्त

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ मार्च -**

तालुक्यातील मस्सा खं येथील एका व्यक्तीकडून अवैध गावठी दारू जप्त करण्यात आली असून पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

पोलीसांच्या माहितीनुसार, अरुण कल्याण शिंदे (वय ५३, रा. मस्सा खं, ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी आपल्या राहत्या घराशेजारी पत्र्याच्या शेडजवळ अंदाजे ३ हजार रुपये किंमतीची ३० लिटर गावठी दारू अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली आढळून आली.

पोलिसांनी तत्काळ कारवाई करून अवैध मद्य जप्त केले. या प्रकरणी अरुण शिंदे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५(ई) अन्वये कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## कार्यकर्त्यांचे प्रेम हीच खरी ताकद : आ. तानाजीराव सावंत

**मा. आरोग्यमंत्री तानाजीराव सावंत यांचा वाढदिवस उत्साहात; वाशी येथील शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून सत्कार**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१५ मार्च -**

महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्यमंत्री तथा भूम-परंडा-वाशी मतदारसंघाचे आमदार तानाजीराव सावंत यांचा वाढदिवस वाशी येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन त्यांना शुभेच्छांचा वर्षाव केला.



वाशी तालुका व जिल्हा स्तरावरील शिवसेना व युवासेना पदाधिकाऱ्यांच्या वतीने सावंत यांचा सत्कार करण्यात आला. शिवसेना उपतालुका प्रमुख तथा कृषी उत्पन्न बाजार समिती (वाशी) संचालक विकास तळेकर यांच्या नेतृत्वाखाली पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन आमदार सावंत यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब मांगले, लाखणगावचे माजी सरपंच अशोक लाखे, पारगावचे सरपंच समाधान मोटे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना आमदार सावंत यांनी कार्यकर्त्यांचे आभार मानत सांगितले की, सामान्य माणसापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचवणे हेच आमचे ध्येय असून कार्यकर्त्यांचे प्रेम हीच माझी खरी ताकद आहे. याप्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांनी सावंत यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा गौरव करत त्यांना दीर्घायुष्य लाभो, अशी प्रार्थना केली. या कार्यक्रमामुळे वाशी तालुक्यातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## गुरुंच्या संस्कारांचा स्वीकार केल्यास यश निश्चित : डॉ. पवार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंना आदर्श मानून त्यांच्या संस्कारांचा स्वीकार करत जीवनाची वाटचाल केली, तर त्यांना निश्चितच यश प्राप्त होते, असे मत तुळजाभवानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जीवन पवार यांनी व्यक्त केले.

श्री तुळजाभवानी ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, तुळजापूर येथे 'शिक्षक व्यक्तिमत्व पुष्प-३' या शिबिराचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जीवन पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य शशिकांत दोंड होते. यावेळी तुळजापूर येथील क्रीडा संकुलात आयोजित 'वंदे मातरम् सार्धशताब्दी महोत्सवा'मध्ये लघुनाटिका व नृत्य स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. पायल झांबरे, नेहा गोडवे, तनुजा भोजने व पूजा साखरे यांनी मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन कल्पना कांबळे व प्रांजली माने यांनी केले. शिबिरामध्ये प्रा. सुनंदा कोळी, स्वाती गरदडे, संजय गंभीरे तसेच प्रथम व द्वितीय वर्षातील छात्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन प्रा. अरुण चौधरी यांनी केले. ट्रॅडिशनल डेचे सूत्रसंचालन पायल झांबरे व तनुजा भोजने यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन शिक्षक व्यक्तिमत्व विभाग प्रमुख प्रा. विवेक कोरे यांनी केले.

## वाहतूक नियमभंगाविरुद्ध ७६ कारवाया; ५४,५०० रुपयांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने १४ मार्च रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहतूक नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध विशेष कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण ७६ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ५४ हजार ५०० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे. नियमांचे पालन करावे, अन्यथा कारवाया पुढेही सुरू राहतील, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

## येडशी येथे एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, येडशी येथे १३ मार्च २०२६ रोजी मुलींना गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे या उद्देशाने एचपीव्ही (ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस) प्रतिबंधक लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

ही मोहीम जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

यावेळी डॉ. स्नेहल शिंदे, डॉ. प्रनिता क्षिरसागर, आरोग्य सहाय्यक सुर्यकांत गंगावणे, सुनील कदम, आरोग्य सहाय्यिका स्वरूपता दारफळकर, अश्विनी कांबळे, फुलाबाई कोळी, युवराज चौगुले, गजानन सुतार तसेच येडशी येथील आशा सेविका उपस्थित होत्या.

डॉ. प्रमोद गिरी यांनी मार्गदर्शन करताना एचपीव्ही लस सुरक्षित व प्रभावी असल्याचे सांगत पालकांनी आपल्या मुलींना लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन केले. आरोग्य विभागाने नागरिकांनी या मोहिमेला सहकार्य करावे, असेही आवाहन केले.

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस विशेषतः मौजे. केशेगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव, परिसरातील सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे आशिल जावेद रशीद शेख, रा. केशेगाव, ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहीर प्रगटन देण्यात येते की, मौजे. केशेगाव, ता. तुळजापूर जि. धाराशिव येथील जमीन गट नं. ३०५, एकुण क्षेत्र ०७ हे ७० आर, यापैकी शहनाज सय्यद शेख यांच्या नावे असलेले जमीन क्षेत्र ०० हे. ८० आर. व सय्यद साहेबलाल शेख यांच्या नावे असलेले जमीन क्षेत्र ०१ हे. ४६ आर. ही मिळकत ७/१२ पत्रकी नोंदीत आहे.

तरी सदर मिळकतीमध्ये आमचे आशिल यांचे हक्क व हितसंबंध आहेत. तसेच सदर मिळकतीच्या अद्याप सरस निरस मानाने वाटण्या झालेल्या नाहीत, त्यामुळे आमचे आशिलांचा हक्क व हिस्सा डावलून शहनाज सय्यद शेख व सय्यद साहेबलाल शेख हे त्यांच्या नावाची नोंद ७/१२ पत्रकी असल्याचा गैरफायदा घेवून सदर मिळकतीची विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत.

तरी सदर मिळकती संबंधी कोणीही खरेदी-विक्री, गहाण, कर्ज, बोजा, तारण, इसार पावती, दान इत्यादी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. जर कोणी वरील प्रमाणे कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. सदरचे जाहीर प्रगटन कोणाची फसगत होऊ नये म्हणून देण्यात आले आहे.

**सबब हे जाहीर प्रगटन दिले असे.**
**दिनांक:- १५/०३/२०२६.**


**जाहीर प्रगटन देणार**
**स्वाक्षरित/-**
**जावेद रशीद शेख**

**तर्फे**
**स्वाक्षरित/-**
**ॲड. फारूख एस. शेख**
तुळजापूर, मो.नं. ९८०४०२६५६

## पहाटे धावले तुळजापूरकर : तुळजाई रोटरी मॅरेथॉन स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ मार्च -**

शहरात आरोग्य जनजागृतीचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आलेली तुळजाई रोटरी मॅरेथॉन स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. दिनांक १५ मार्च रोजी रोटरी क्लब आणि विठाई हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





या मॅरेथॉनमध्ये २, ५ आणि १० किलोमीटर अशा तीन गटांमध्ये धावण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शहरातील नागरिक, विद्यार्थी, खेळाडू तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

एक धाव आरोग्यासाठी या संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून नियमित व्यायामाचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. समाजामध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, नागरिकांना नियमित व्यायामाची सवय लावणे आणि निरोगी आयुष्याचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवणे हा या मॅरेथॉनचा मुख्य उद्देश होता. सकाळच्या आल्हाददायक वातावरणात सुरू झालेल्या या स्पर्धेत सहभागी धावपटूंनी उत्साहाने धाव घेत शहरात आरोग्याचा संदेश दिला. आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले की, अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्याबाबत सकारात्मक विचार निर्माण होतो आणि नागरिकांना सक्रिय जीवनशैली अंगीकारण्याची प्रेरणा मिळते.

भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करून जनजागृती वाढवण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

तुळजापूर शहर व परिसरातील शेकडो नागरिकांनी सहभाग नोंदवून या मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम आनंदी व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करण्यावर भर द्यावा : खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ मार्च-**

भारत हा कृषीप्रधान देश असून शेतकरी हा आपल्या देशाचा अन्नदाता आहे. तो प्रत्येकाच्या ताटात अन्न पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य करतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. उत्पादन वाढीसोबतच आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करत तंत्रज्ञानाची जोड द्यावी, असे प्रतिपादन राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी केले.

नांदेड येथे आयोजित जिल्हा कृषी व धान्य महोत्सव व प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर जिल्हा कृषी व धान्य महोत्सवाचे १५ ते १७ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास खासदार रविंद्र चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख, कृषी उपसंचालक कैलास वानखेडे, उपसंचालक आत्मा अर्चना गुंजकर, किशोर स्वामी, प्रगतशील शेतकरी, नागरिक आदी मोठया संख्येने उपस्थित होते. महोत्सवात विविध विषयांवरील शेतकरी-शास्त्रज्ञ परिसंवाद, चर्चासत्रे, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, कृषी मालाचे प्रदर्शन तसेच खरेदीदार-विक्रेता संमेलन होणार आहे.

खासदार अशोक चव्हाण म्हणाले की, काळानुसार शेती करताना शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता आधुनिक व नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करावा. शेतीत एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) सारख्या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास उत्पादन वाढीस मदत होईल व शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या लाभ होईल.

**शेतीसोबत शेतीपूरक व्यवसायाकडे वळा : खासदार रविंद्र चव्हाण**

डिजिटल युगात शेती करताना शेतकऱ्यांना आता जगातील इतर शेतकऱ्यांशी स्पर्धा करावी लागत आहे. त्यामुळे उत्पादन कसे वाढवता येईल आणि कमी खर्चात अधिक उत्पादन कसे मिळेल याकडे शेतकऱ्यांनी लक्ष द्यावे. तसेच आधुनिक शेतीसोबत शेतीपूरक व्यवसायाकडे वळल्यास शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल, असे आवाहन खासदार रविंद्र चव्हाण यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, परदेशात वापरले जाणारे आधुनिक शेती तंत्रज्ञान तसेच विविध विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रांचा शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होणार आहे. शेतकऱ्यांनी काळानुसार पीक पद्धतीत बदल करावा. ऊसाची उत्पादकता वाढविण्यासाठी एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता)चा वापर करावा तसेच सेंद्रिय शेतीला प्राधान्य द्यावे. शेतीत विविध नाविन्यपूर्ण प्रयोग राबवून उत्पादन वाढविण्यावर भर देण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# कोचिंग क्लासेस कडून शिक्षणाचा काळा बाजार

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि. १५ मार्च-**

सध्या स्पर्धेच्या युगात गुणवत्ता पुर्ण शिक्षणाच्या नावाखाली कोचीग क्लासेसचा व्यवसाय वाढत असुन शिक्षणाचे बाजारीकरण सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे.बालवाडी पासुनच विद्यार्थ्यांच्या पाठीवर दप्तर पेक्षा शिकवणी चे ओझे जास्त वाढले आहे.गावोगावीआणि शहराच्या गल्लीबोळात कोचीग क्लासेसचे पेव फुटले असुन गुणवत्तेच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या भविष्याचा बाजार मांडला जात असल्याची तिव्र नाराजी पालकांकडून व्यक्त होत आहे.

टॉपर आमचाच शंभर टक्के निकाल किंवा मर्यादीत प्रवेश अशा आकर्षक घोषणांनी पालकांना आणि विद्यार्थ्यांना आकर्षीत केले जाते. मात्र प्रत्यक्षात अनेक क्लासेस मध्ये दर्जेदार शिक्षणापेक्षा जाहीरीतीचा दिखावा आणि पैशाचा खेळ अधीक असल्याचा आरोप होत आहे.काही संस्थांकडून दुसऱ्या शाळा किंवा क्लासेस गुणवंत विद्यार्थ्यांचे फोटो वापरून त्यांना आपले विद्यार्थी असल्याचा दावा केला जातो. अशा दिशाभुल करणा-या जाहीराती मुळे पालकांची फसवणुक होत असल्याचे अनेक उदाहरणे समोर आली आहे.याहुन गंभीर बाब म्हणजे काही ठिकाणी परीक्षेपूर्वी कथीत प्रश्नपत्रीका व्हाटस् प वर आणि सोशल मीडिया वर व्हायरल करून क्लासची गुणवत्ता सीध्द करण्याचा प्रकार उघडकीस येत आहे..या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिल्याचा आभास निर्माण करून अधिका अधीक प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच मोठमोठी स्वप्न दाखवून विद्यार्थ्यांन कडुन लाखो रूपयांची फी उकळली जाते काही ठीकाणी काही महीन्या नंतर संस्था अचानक बंद करून संचालक प्रसार झाल्याच्या घटना घडल्या आहेत.शाळेतील शिक्षणासोबतच कोचीग क्लासेसचा वाढता ताण विद्यार्थ्यांच्या मानसीक आरोग्यावर परीताम करीत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे सकाळी शाळा आणि संध्याकाळी क्लासेस अशा धावपळीत विद्यार्थ्यांचा खेळ, छंद आणि मोकळा वेळ पूर्णपणे हरवत चालला आहे.सततच्या स्पर्धे मुळे आणि अपेक्षाच्या ओझ्यामुळे अनेक विद्यार्थी तनावाखाली जगत आहे.शिक्षणाचे वाढते दडपण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाला मारक ठरत असल्याचे शिक्षण तज्ञांचे मत आहे.कोचीग क्लासेसच्या वाढत्या फी मुळे पालकांना आर्थीक ताण सहन करावा लागत आहे.मुलाच्या उज्जल भविष्यासाठी पालक कर्ज काढून किंवा बचतीचा पैसा खर्च करून क्लासेस ची फी भरत आहे. .मात्र अपेक्षीत निकाल न मिळाल्यास त्यांना आर्थीक व मानसीक दोन्ही प्रकारचा फटका बसत आहे.कोचीग क्लासेस मनमानी कारभारावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कडक नियमावली लागु करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.प्रत्येक कोचीग क्लासेसची अधिकृत नोंदणी अनिवार्य करणे ,शिक्षकाची पात्रता व शुल्क जाहीर करणे,जाहीरातेची सत्यता तपासकारी यंत्रणा उभारणे आवश्यक असल्याचे मत शिक्षणक्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत.शिक्षणाचा हा वाढता बाजार थांबवून ज्ञानदानाचे पावित्र्य जपले जावे. अशी रास्त मागणी पालकाकडून होत आहे.

## इस्लापूर येथील सूर्यकांत आंबटवाड यांची पोलीस उप निरक्षक पदी निवड

**इस्लापूर-** किनवट आगारामध्ये वाहक पदावर सेवानिवृत्त झालेले कर्मचारी गंगाधर आंबटवाड यांची चिरंजीव सूर्यकांत गंगाधर आंबटवार यांची पीएसआय पदी निवड झाली आहे. अत्यंत हलाखीची परिस्थिती असताना सामान्य कुटुंबातील त्यांचे आई वडील यांनी अपार कष्ट



परिश्रम करून त्याला कुठेही शिक्षणासाठी कमी पडू दिली नाही. त्यातच त्याच्या आयुष्यात मायेची उप देणारी त्याची आई लक्ष्मी आंबटवाड यांचे खूप मोठे योगदान आहे. या यशात त्याचा भाऊ अनंत आंबटवाड यांचे पण खूप मोठे योगदान आहे आणि त्याने वेळोवेळी त्याच्या भावाला परीक्षेच्या काळात त्याला मदत केली आहे. या यशामुळे ग्रामीण भागातील गरीब घरातील मुलांना स्पर्धापरीक्षेत यश संपादन करण्यासाठी नक्कीच प्रोत्साहन मिळेल. श्री शिव गणेश मित्र मंडळातर्फे पुष्पहार टाकून गुलालाची उधळण करत अभिनंदन केले व त्याच्या भविष्यातील पुढील वाटचाली साठी गावातील ग्रामस्थांमधून मोठ्या प्रमाणात शुभेच्छा प्राप्त झाल्या. पुढील आयुष्यात त्याने असेच यश मिळवून गावाचे नाव उंचावावे, अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया सुद्धा जाणकार मंडळीच्या तोंडून ऐकावयास मिळाल्या.

## गोरठेकर बंधूकडून मुस्लिम बाधंवाना इफ्तार पार्टी

**उमरी -** मुस्लिम समाजाचा पवित्र सण रमजान चालु असुन दोन्ही समाजात ऐकोपा भाईचारा नादावा सर्वधर्म समभाव ही भावाना जपत गोरठेकर बंधूनी वर्षानू वर्षाची परंपरा राखत उमरी शहरातील मर्कज मशीद येथे गोरठेकर बंधू व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून मुस्लिम बांधवांना इफ्तार पार्टीचे देण्यात आली . यावेळी कृषी उत्पन्न बाजार समीतीचे




सभापती शिरिशभाऊ गोरठेकर व उमरी नगरपालिकेचे उपनगरध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर ( केडी बॉस ) , माजी नगराध्यक्ष तथा विद्येमान नगरसेवक प्रविणभाऊ सारडा , गटनेते राजेश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत मुस्लिम बांधवांना इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मर्कज मशीद चे सदर सय्यद फारुख, नगरसेवक ऐजास खान, शेख रशीद सेठ, रशीद यांनी शिरिषभाऊ कैलासभाऊ नगरध्यक्ष प्रतिनिधी भगवान मुदीराज, प्रविणभाऊ सारडा, गटनेते राजेश जाधव व नगरसेवक व प्रतिनिधी या मान्यराचे स्वागत करुन शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी मशीदचे आमिर नवाज बेग, नगरसेवक बाबुबेग, नगरसेवक प्रतिनिधी वसीम सेठ कुरेशी,जावेद खान,आनदराव यलमगोडे, मन्सूर खान पठाण, हाजी अहेमद बेग,गटनेता राजेश जाधव, नगरसेवक साईनाथ जमदाडे, स्वीय सहाय्यक नागेश, बट्टेवाड,अलसटवार, गजानन खांडरे , रतन खदारे,राजु पाटील ढगे, पोलिस पाटील दतात्रेय वारेवार,इरबा शेळके,आमित पटकुटवार,इलियास पठाण, गोडगे मामा, अनत रैपनवाड,अशोक झडते, नारायणराव जिरोनेकर, नगरसेवक प्रतिनिधी खाडरे, पत्रकार पाडुरग सोनकांबळे फेरोज पटेल, फरहद बेग,ईश्वर रननवरे, आदी मान्यवर उपस्थित होते.

## श्री संत बाळूमामा मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्त शंकर पटाचे उद्‌घाटन

**हदगाव -** हदगाव तालुक्यातील मोजे नेवरवाडी येथे श्री. संत बाळूमामा मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्ताने भव्य शंकर पटाचे आयोजन करण्यात आले असून सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन रामराव मिजगर माजी सरपंच



नेवरवाडी, प्रख्यात सिने अभिनेते तथा दिग्दर्शक संतोष मिजगर, भाजपा ग्रामीण तालुकाध्यक्ष सूर्यकांत हनवते, भाजपा ओबीसी मोर्चा ज्येष्ठ नेते किसनराव मिजगर यांच्यासह भाजपाचे इतर पदाधिकारी व सर्व गावकरी मंडळी यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडले श्री संत बाळूमामा मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्त नेवरवाडीत भव्य शंकर पटाचे आयोजन व त्यासोबतच कीर्तनाचे देखील भव्य असे कार्यक्रम आयोजित करण्यात आली असल्याची माहिती मिळाली असून सदरील शंकरपटाची एकूण २१ बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. दि.१५ मार्च रोजी संध्याकाळी ८ ते १० ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज हिंगोलीकर यांचे कीर्तन तर दि.१६ मार्च ला सकाळी बाळूमामाची पालखीची मिरवणूक गावातून निघेल नंतर प्राणप्रतिष्ठापण संपन्न होणार आहेत. ह भ प राम महाराज खोरसकर यांचे कीर्तन सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत होईल त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती कळविण्यात आली आहे.

## पंचायत राज अभियानांतर्गत सिने कलाकारांची ग्रामपंचायतींना भेट

**नांदेड -** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा प्रसार तळागाळापर्यंत व्हावा तसेच ग्रामीण भागात विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने नांदेड जिल्ह्यात सिने कलाकारांनी गावांना भेट देत विकासकामांची पाहणी केली. याअंतर्गत अभिनेते संदीप पाठक व अभिनेत्री रसिका वेंगुर्लेकर यांनी १३ मार्च रोजी नांदेड तालुक्यातील ग्रामपंचायत नेरली तर्फे बोंढार, देगलूर तालुक्यातील येरगी तसेच अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव महादेव येथे भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली. भेटीदरम्यान त्यांनी गावांमध्ये राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा, वृक्षारोपण, पाणीपुरवठा व्यवस्था, स्वच्छता उपक्रम, घरकुल योजना तसेच ग्रामपंचायतींचे विविध अभिनव उपक्रम यांची माहिती घेतली.

# मल्टिपर्पज हायस्कूल इमारतीच्या नूतनीकरणासाठी निधी द्या : आ. बोंढारकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ मार्च-**

नांदेड शहरातील मल्टिपर्पज हायस्कूल ही पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण देणारी अनेक वर्षांपासूनची जुनी शाळा असून सध्या या शाळेतील बहुतांश वर्गखोल्या पूर्णपणे मोडकळीस आल्या आहेत. त्यामुळे येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना अक्षरशः जीव मुठीत घेऊन शिक्षण घ्यावे लागत असल्याचा मुद्दा आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी विधानभवनात उपस्थित केला. दुरुस्तीसाठी निधीची मागणी करण्यात आली.



नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना त्यांनी सांगितले की, मल्टीपर्पज शाळेची इमारत जीर्ण झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना योग्य व सुरक्षित वातावरणात शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे.म्हणूनच या शाळेच्या इमारतीचे तातडीने नूतनीकरण करण्यात यावे तसेच नवीन वर्गखोल्या उभारण्यासाठी शिक्षण विभागामार्फत निधीची तातडीने तरतूद करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली.विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि चांगल्या वातावरणात शिक्षण मिळणे ही आपली सर्वांची जबाबदारी असून शासनाने या बाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही आमदार बोंढारकर यांनी व्यक्त केली.

# देगलूर येथे संभाजी ब्रिगेडचा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**हाणेगाव, दि. १५ मार्च-**

देगलूर येथील शासकीय विश्रामगृहात संभाजी ब्रिगेडच्या वतीने पदनियुक्ती व पक्षप्रवेश सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात देगलूर तालुक्यातील विविध गावांमधून आलेल्या अनेक पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी संभाजी ब्रिगेडमध्ये प्रवेश करून संघटनेला बळकटी दिली.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष जेजेराव पाटील शिंदे (करडखेडवाडीकर), जिल्हा उपाध्यक्ष संतोष चिद्रावार लोणीकर, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी जाधव (अंदेगावकर), जिल्हा संघटक दत्ता पाटील केरूरे (सुगावकर), विधानसभा अध्यक्ष देविदास थडके तसेच तालुकाध्यक्ष शहाजी बाबरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



मान्यवरांनी संभाजी ब्रिगेडच्या विचारधारेविषयी मार्गदर्शन करत संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले.

यावेळी देगलूर तालुक्यातील विविध पदांसाठी पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. त्यामध्ये लोणी येथील सामाजिक कार्यकर्ते भगवान काळे पाटील यांची संभाजी ब्रिगेडच्या देगलूर तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच हणमंत पाटील कोसंबे यांची तालुका कार्याध्यक्षपदी, व्यंकट नरवाडे करडखेडकर यांची शिक्षक आघाडी अध्यक्षपदी, तानाजी सुकनाळे मरतोळीकर यांची शिक्षक आघाडी कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

तसेच नरसिंग तुकाराम अन्नमवार यांची हणेगाव सर्कल प्रमुखपदी, शहाजी मुदिराज (कु.वाडी) यांची करडखेड सर्कल प्रमुखपदी तर जगदीश जाधव हाळीकर यांची देगलूर तालुका सचिवपदी निवड जाहीर करण्यात आली. य सोहळ्यात झरी, रामपूर, सोमूर, करडखेड, बेबंरा, सावरगाव तसेच परिसरातील इतर गावांमधील विविध पक्षांचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संभाजी ब्रिगेडमध्ये पक्षप्रवेश करून संघटनेशी निष्ठा व्यक्त केली. नव्याने प्रवेश केलेल्य कार्यकर्त्यांचे मान्यवरांनी स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी संघटनेच्य माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या प्रश्नांवर ठामपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# उद्यमी ग्लोबल फाउंडेशन जेनियाकच्या पुढाकारातून उद्योजकता विकास शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ मार्च-**

उद्यमी ग्लोबल फाउंडेशन, गोदावरी फाउंडेशन व जेनियाक यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त एकदिवसीय उद्योजकता विकास शिबिर उत्साहात पार पडले.या शिबिरात महिला व नवउद्योजकांना व्यवसायाच्या विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी राजश्री पाटील म्हणाल्या की,आजच्या काळात महिलांनी आपले कौशल्य ओळखून बाजारातील गरजेनुसार व्यवसाय निवडला पाहिजे. व्यवसाय टप्प्याटप्प्याने वाढत असतो, त्यासाठी सातत्य, प्रामाणिकपणा आणि नाविन्यपूर्ण विचार आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच शॉप ॲक्ट, उद्यम नोंदणी,बँक लिंकेज, आर्थिक साक्षरता व क्षमता बांधणी या विषयांवर उद्यमी ग्लोबल फाउंडेशन काम करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

ऋषिकेश कोंढेकर यांनी उद्योजकता : काल, आज आणि उद्या या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, उद्योजकांनी स्वतःवर आत्मविश्वास ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या कामाला अर्थनिर्मितीचे स्वरूप द्यायचे असेल, वैयक्तिक, सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठा निर्माण करायची असेल आणि स्वावलंबी व्हायचे असेल तर महिलांनी उद्योजकतेकडे वळले पाहिजे.

आशिष राऊत यांनी स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की,स्वतः पुरता रोजगार निर्माण करणे म्हणजे स्वयंरोजगार,तर स्वतःचा व्यवसाय उभा करून इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देणे म्हणजे उद्योजकता होय. इतरांपेक्षा आपल्या कामात वेगळेपण असणे आवश्यक असून उद्योजकाची माहितीची भूक मोठी असली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. यावेळी गोदावरी अर्बनचे संचालक प्रा.सुरेश कटकमवार, व्यावसायिक प्रशिक्षक ऋषिकेश कोंढेकर,स्टेट बँक ऑफ इंडियाचे ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षक आशिष राऊत, शिवधारा महिला पतसंस्थेच्या सचिव नीता कटकमवार, उपाध्यक्ष कीर्ती तगडपल्लेवार, संचालक रेवती रगटे, विजया बोरसे,प्रतिक्षा पतंगे,वैष्णवी पाटील, रंजना चव्हाण,उद्यमी फाऊंडेशनच्या ममता वानखेडे,आशा कलाने,रोहिणी भोयर,सावित्री संगेवार यांच्यासह अनेक उद्योजक महिला उपस्थित होत्या.

# देगलूर महाविद्यालयात खुली व्यायामशाळा सुरू; विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या तंदुरुस्तीला नवे व्यासपीठ

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. १५ मार्च-**

देगलूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह शहरातील नागरिकांचे आरोग्य निरोगी व तंदुरुस्त राहावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या माध्यमातून अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाला खुली व्यायामशाळा मंजूर करण्यात आली. नुकतेच महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर या खुल्या व्यायामशाळेचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले.

उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कार्यकारिणी सदस्य सूर्यकांत नारलावार, रवींद्रअप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, विजय उनग्रतवार तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ उपस्थित होते.

मानवी जीवन निरोगी व निकोप राहण्यासाठी नियमित व्यायाम अत्यंत



आवश्यक असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. खुली व्यायामशाळा सुरू झाल्यामुळे देगलूर महाविद्यालयातील विद्यार्थी, खेळाडू, प्राध्यापक व कर्मचारी वर्ग तसेच शहरातील नागरिकांच्या आरोग्याला निश्चितच लाभ होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या व्यायामशाळेत सीटअप स्टेशन, शोल्डर बिल्डर, डबलबार, आउटडोअर मिनी स्कीट, फिटनेस सायकल यांसह एकूण १२ विविध प्रकारची आधुनिक उपकरणे बसविण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यार्थी, पालक तसेच क्रीडाप्रेमींसाठी व्यायामाच्या सर्व सोयी उपलब्ध झाल्या आहेत. सकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांनाही मैदानावर विविध प्रकारचे व्यायाम सहज करता येणार आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बा. रा. कतूरवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. निरज उपलंचवार यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, डॉ. एम. एम. चमकुडे, डॉ. व्ही. जी. शेरीकर, पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख प्रा. दीपक वावधाने, प्रा. सीताराम हाके, तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनसीसी व क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गोमातेच्या सन्मानासाठी ‘गो सन्मान आवाहन अभियान’

**तभा वृत्तसेवा**
**नरसी, दि. १५ मार्च-**

गोमातेचे संरक्षण, सेवा आणि सन्मान या उद्देशाने देशभरात गो सन्मान आवाहन अभियान राबविण्यात येत असून नागरिकांनी या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अभियानाच्या महाराष्ट्र राज्य प्रभारी नेहा ताई कोटूरवार व नांदेड जिल्हा प्रभारी महेश सोमनवार यांनी केले आहे. या अभियानातून समाजात गोमातेविषयी जागरूकता निर्माण करून तिच्या संरक्षणासाठी मोठा प्रयत्न केला जात आहे.

भारतीय संस्कृतीत गोमातेला पूजनीय



स्थान आहे. या पार्श्वभूमीवर सेवा, सुरक्षा आणि सन्मान या त्रिसूत्रीवर आधारित जनजागृती अभियान राबविले जात असून समाजातील सर्व घटकांनी यात सहभागी व्हावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत २७ एप्रिल २०२६ आणि २७ जुलै २०२६ हे दिवस ‘गो सन्मान दिवस’ म्हणून पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या दिवशी नागरिकांनी तहसीलदार, उपविभागीय कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन यांच्या माध्यमातून राष्ट्रपती, पंतप्रधान, गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या नावाने निवेदन देण्याची योजना आहे.

दरम्यान, या अभियानाच्या पार्श्वभूमीवर नायगाव तालुक्यातील नरसी येथे दि.१४ मार्च रोजी नरसी येथील श्री भगवान बालाजी मंदीरात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अभियानाचे उद्दिष्ट व पुढील नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी नरसी येथील व्यापारी अनिल सावकार श्रीरमवार, गणेश कंदुरके, माधव चितंले, तालुका प्रभारी गंगाधर पवार, किसान प्रभारी अंकुश चेन्नापुरे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

गोमातेच्या संरक्षणासाठी व तिच्या सन्मानासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेऊन अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. तसेच या अभियानात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी ९०६७७७७३२३ या क्रमांकावर मिस कॉल देऊन नोंदणी करावी, असे आयोजकांनी सांगितले आहे.

